मार्गशीर्षः मृगशीर्षेणयुक्तापौर्णिमा मार्गशीर्षी सायत्रास्तिसमार्गशीर्षः, मृगशीर्ष नक्षत्रानें युक्त आहे पौर्णिमा जाचेठायीं तो. त. मार्गशीर्षमास. अ. पु.

मार्गितं मार्ग्यतेस्ममार्गितं, मार्गण करिजेलें जें तें. कृ. मार्गधा. अन्वेषणअ. शोधलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मार्जनः मार्ज्यतेनेनेतिमार्जनः, शुद्ध होइजेतें जेणें करून तो. कृ. मृजुधा. शुद्धिअ. लोधवृक्ष. अ. पु. २ प्रोक्षणानें शुद्ध करणें. अ. न.

मार्जनी विग्रहादि मार्ष्टिशब्दाप्रमाणें. आ. स्त्री.

मार्जारः मार्ष्टिमुखमितिमार्जारः, मुखातें शुद्ध करितो जो तो. कृ. मृजूधा. शुद्धिअ. माजर. अ. पु.

मार्जिता मार्ज्यतेइतिमार्जिता, शुद्ध करिजेत्ये जी ती. कृ. मृजूधा. शुद्धिअ. श्रीखंड. आ. स्त्री.

मार्तंडः मार्तांडः मृतंडेभवः मार्तंडः, मृतंड ऋषीचे ठायीं जो उत्पन्न तो. त. सूर्य. अ. पु.

मार्दंगिकः मृदंगवादनंशिल्पमस्य मार्दंगिकः, मृदंग वादन आहे शिल्पजाचें तो. त. मृदंग वाजविण्याविषयीं कुशल. अ. पु.

मार्द्वीकं मृद्वीकायाः विकारोमार्द्वीकं, द्राक्षाचा जो विकार तें. त. द्राक्षा मद्य. अ. न.

मार्ष्टिः मृज्यतेनयामार्ष्टिः, मलाचा अथवा केशाचा नाश होइजे तोजीणें ती. कृ. मृजुधा. शुद्धिअ. प्रोक्षणादिकें करून देह शुद्ध करणें. इ. स्त्री.

मालकः मलतेऽसौमालकः, अमृतातें धारण करितो जो तो. कृ. मलधा. धारणअ. निंबवृक्ष. अ. पुल्लिंगीं.

मालती मां लक्ष्मीं लसतीति मालती, लक्ष्मीतें स्वेच्छितये जी ती. कृ. लसधा. क्रीडनअ. चमेलीजाई. ई. स्त्री.

माला माल्यतेइतिमाला, धारण करिजेस्ये जीती. कृ. मलधा. धारणअ. फुलांची माळ. आ. स्त्री.

मालाकारः मालांकरोतीतिमालाकारः, पुष्पमालेतें करितो जो तो. कृ. डुकृञ्धा. करणअ. माळी. अ. पु.

मालातृणकं मालाकाराणितृणान्यस्य मालातृणकं, मालाकार आहेत तृणें ज्याचीं तो. स. जलतृण विशेष. अ. न.

मालिकः मालाशिल्पमस्य मालिकः, माला आहे शिल्प ज्याचें तो. त. माळी. अ. पु.

मालूरः मां लक्ष्मीं परेषां लुनातीति मालूरः, दुसरे वृक्षाचा शोभेचें नाश करितो जो तो. कृ. लुञ्धा. छेदनअ. बेलाचें झाड. अ. पु.

माल्यं विग्रहादमालाशब्दाप्रमाणें. फुलांची माळ. अ. न.

माल्यवान् माल्यमस्तियस्यसः माल्यवान् माल्य आहे ज्यास तो. त. पर्वत विशेष. त्. पु.

माषपर्णी माषस्येव पर्णान्यस्या माषपर्णी, उडदाचे सारखीं आहेत पर्णें जीचीं ती. स. रानउडीद. ई. स्त्री.

माषीणं माषाणां भवनं क्षेत्रं माषीणं, माषांचें उत्पत्तिक्षेत्र जें तें. त. उडीद उत्पन्न होण्याचें शेत. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

माष्यं विग्रहादि पूर्वीच्याशब्दाप्रमाणें.

मासः मस्यति परिणमतीति मासः, नियमित कालानें परिणाम पावतो जो तो. कृ. मसीधा. परिणामअ. महिना. अ. पु.

मासरः मस्यतेइतिमासरः, विकार करिजेतो जो तो. कृ. मसीधा. परिणामअ. अन्नापासून झालेला मंड. अ. पु.

मास्म मा च स्म च अनयोः समाहारः मास्म, मा आणि स्म यांचा जो समाहार तो. स. निवारणत्वा अर्थी अव्यय.

महाकुल: महतकुलंयस्यमहाकुल:, मोठें आहे कुल ज्याचें तो. स. सज्जन. अ. पु.

माहिष्य: महिष्यांसाधुर्माहिष्य:, महिष्यास्त्रीचेठायीं जो उत्तम तो. क्षत्रियापासून वैश्येचेठायीं जाहलेलापुत्र. अ. पु.

माहेयी मह्या अपत्यंस्त्री माहेयी, धेनूचीजी कन्या ती. त. गाय. ई. स्त्रीलिंगी.

मितंपच: मितंपचतीतिमितंपच:, परिमित पाक करितो जो तो. कृ. डुपचष्धा. पाक अ. कृपण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मित्रं मेद्यतीतिमित्रं, प्रीति करितो जो तो. कृ. ञिमिदाधा. स्नेहन अ. सखा. अ. न. २ सूर्य. अ. पुल्लिंगी.

मिथ: मेथतीतिमिथ:, परस्परच्या अर्थी संगत ह्म. प्राप्त जें तें. कृ. मेथृधा. संगम अ. परस्पर. २ एकांत स्थल ह्या अर्थी अव्य.

मिथुनं मेथयतीतिमिथुनं, संगम करितें जें तें. कृ. मिथधा. संगमअ. स्त्रीव पुरुष. २ मिथुनराश. अ. न.

मिथ्यादृष्टि: मिथ्याचासौदृष्टिश्चमिथ्यादृष्टि:, अपन्हव विषयिणी अशी जी दृष्टी ती. स. नास्तिक. इ. स्त्री.

मिथ्याभियोग: मिथ्याचासौ अभियोगश्चमिथ्याभियोग:, मिथ्या ह्म. खोटा असा जो अभियोग ह्म. अभिशंसन तो. स. खोटी फिर्याद. अ. पु.

मिथ्याभिशंसनं असत्यमभिशस्यतेमिथ्याभिशंसनं, असत्य अभिशंसन करिजेतेंजें तें. कृ. शंसधा. स्तुतिअ. मिथ्या पापोद्भवन. अ. न.

मिथ्यामति: मिथ्याचासौमतिश्चमिथ्यामति:, मिथ्या ह्म. विरुद्ध अशी जी मति ती. स. अयथार्थ ज्ञान. इ. स्त्री.

मिशि: मिशी मिशतीतिमिशि:, वातादिकाविषयीं रोष करितें ह्म. तन्नाशक जी ती. कृ. मिषधा. रोषकरणअ. बडिशोप. इ. २ ई. स्त्रीलिं.

मिश्रेया मिश्रयतीतिमिश्राइय

तीति एया, मिश्राचासोएयाचमि श्रेया, स्वकीय आस्वादातें मिश्र करिते जी ती. मिश्रा मिश्रा अशी जी एया ह्म. ज्ञात तीमिश्रेया, स. बडिशेप. आ. स्त्री.

मिसि: मिसी मस्यतेइतिमिसि:, रोगाचा परिणाम ह्म. नाश करिते जी ती. कृ. मसीधा. परिणाम अ. बडिशेप. २ जटामांसी. ३ शोपेची भाजी. इ. २ई.स्त्री

मिहिका मेहतीति मिहिका, उदक सेचन करिते जी ती. कृ. मिहधा. सेचनअ. बर्फ. आ. स्त्री.

मिहिर: मेहतीतिमिहिर:, वृष्टि द्वारा सेचन करितो जो तो. कृ. मिहधा. सेचन अ. सूर्य. अ. पु.

मीढं मिह्यतेस्मसीढं, सेचन करिजेला जो तो. कृ. मिहधा. सेचन अ. मुतलेला वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मीन: मीयतेधीवरेणइतिमीन:. मिनोतिक्षिपतिजलमितिवामीन:, धीवरानें भृत्त होउजेतोकिंवा जल प्रक्षेप करितोजो तो. कृ. मीङ्धा. हिंसा अ. २डुकृञ्धा. प्रक्षेपणअ. मत्स्य. २मीन रास अ. पु.

मीनकेतन: मीन: केतनंध्वजो यस्यसमीनकेतन:, मीन ह्म. मत्स्य आहे ध्वज ह्म. चिन्ह जाचें तो. स. मदन. अ. पु.

मुकुटं मंकतेनेनमुकुटं, भूषण होतें जेणेंकरून तें. कृ. मकिधा. मंडनअ. किरीट. अ. न.

मुकुंद: मुकुंमुक्तिंयच्छतीतिमुकुंद:, मुक्तीतें देतोजो तो. कृ. दाणधा. दानअ. विष्णु. २ पोईशाक. अ. पु.

मुकुर: मुंचतिज्योतिर्मुकुर:, तेज सोडणारा जो तो. कृ. मुञ्चधा. मोक्षणअ. आरसा. अ. पु.

मुकुल: मुंचतिकलिकात्वमिति मुकुल:, कलिकेतें सोडणाराजो तो. कृ. धा. पूर्वीच्या शब्दाप्रमाणें. किंचित्फुललेली कळी. अ. पु. न.

मुकुषक: विग्रहादिमकुष्टकशब्दाप्रमाणें. मटकी. अ. पु.

मुक्तकंचुक: मुक्त: कंचुकोयेनसमुक्तकंचुक:, मुक्त ह्म. त्यक्त आहे कंचुक ह्म. तनूरूपकवच जाणें तो. स. मेंगटाकलेलासर्प. अ. पु.

मुक्ता मुंचतेस्ममुक्ता, मुक्तकरिजे त्येजी ती. कृ. मुच्लृधा. मोक्षणअ. मोतीं. आ. स्त्री.

मुक्तावली मुक्तानामावलीमुक्तावली, मौक्तिकांची जी पंक्ती ती. स. मोत्यांचा हार. ई. स्त्री.

मुक्तास्फोटः मुक्ताःस्फुटंतियतःमुक्तास्फोटः, मौक्तिकें उत्पन्न होतात ज्यापासून तो. कृ. स्फुटधा. विकसनअ. ज्यांत मोतीं पिकतें तो शिंपा. अ. पु.

मुक्तिः मोचनंमुक्तिः, मोक्षजो ती. कृ. मुच्लृधा. मोक्षणअ. मोक्ष. इ. स्त्री.

मुखं खन्यतेअनेनमुखं भक्षणादि करिजेतें जेणें तें. कृ. खनुधा. अवदारणअ. मुख. २ पुढील दार. अ. न.

मुखरः निंदितंमुखमस्यमुखरः, निंदित आहे मुख ज्याचें तो. त. तोंडाळ. अ. पु.

मुखवासनः मुखंवासयतीति मुखवासनः, मुखातें सुगंधित करितो जो तो. कृ. वासधा. उपसेवाअ. तोंडास सुवास करणारें तांबूलादि. अ. पु.

मुख्यः मुखमिवप्रधानत्वान्मुख्यः, मुखा सारिखा जो प्रधान तो. त. आद्य पक्ष. २ प्रमुख. अ. पु.

मुग्धः मुह्यतीतिमुग्धः, अविवेकी जो तो. कृ. मुहधा. वैचित्त्यअ. मूर्ख. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मुंडः मुंड्यतेइतिमुंडः, केशानें हीन होतो जो तो. कृ. मुडिधा. खंडनअ. मुंडन केलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री. २ शिरोहीन देह. अ. न.

मुंडितः विग्रहादिमुंडशब्दाप्रमाणें. मुंडन केलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मुंडी मुंडयतीतिमुंडी. क्षौर करितो जो तो. कृ. मुंडप्रकृतिकधा. तत्करणअ. नापित. इन्. पु.

मुदिरः मोदतेअनेनमुदिरः, संतोष पावताहेत मयूरादि जेणें तो. कृ. मुदधा. हर्षअ. मेघ. अ. पु.

मुद् मोदनंमुद् हर्षजो ती. कृ. मुदधा. हर्षअ. द्. स्त्री.

मुद्गपर्णी मुद्गपर्णमस्यामुद्गपर्णी. मुद्ग सदृश आहे पर्ण जीचें

ती. स. रान मूग. ई. स्त्री.

मुद्गर: गिरतीतिगर: मुदोगरोमुद्गर:, हर्ष नाश करणारा जो तो. स. मुद्गल. अ. पु.

मुधा मुह्यतीतिमुधा, अविवेक प्रापक जें तें. क्र. मुहधा. वैचित्त्य अ. व्यर्थ त्या अर्थी अव्य.

मुनि: मन्यतइति मननशीलोवा मुनि:, सर्व जाणतो किंवा मनन स्वभाव जो तो. क्र. मनधा. ज्ञान अ. बुद्ध. २ ऋषि मौनी. इ. पु.

मुनींद्र: मुनीनामिंद्रोमुनींद्र:, मुनी मध्यें जो श्रेष्ठ तो. स. बुद्ध. २ मौन व्रत धारण केलेला ऋषि श्रेष्ठ. अ. पु.

मुरज मुरश्चर्मपट्टिकावेष्टनंतस्माज्जातोमुरज:, चर्म पट्टिके पासून निर्मित जो तो. क्र. जनीधा. प्रादुर्भावअ. मृदंग. अकारांत. पु.

मुरा मुरतीतिमुरा, वृक्षादिकांप्रत वेष्टन करित्ये जी ती. क्र. मुरधा. वेष्टनअ. तालीस पत्र. आ. स्त्रीलिंगी.

मुषा मुषतीतिमुषा, रूपर्यादि स्तेय करित्ये जी ती. क्र. मूषधा. स्तेयअ. धातूचा रस करण्याची मूस. आ. स्त्री.

मुषितं मुष्यतेस्ममुषितं, स्तेय करिजेलें जें तें. क्र. मुषधा. स्तेयअ. चोरलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मुषी ह्रस्वामुषामुषी, ह्रस्व जी मूस ती. स्त्रीप्र. लाहान मूस. ई. स्त्री.

मुष्क: मुष्णाति रेतो मुष्क:, रेत स्तेय करणारा जो तो. क्र. मुषधा. स्तेयअ. अंड कोश. अ. पु.

मुष्कक: मुष्णातिरोगमितिमुष्क: सएव मुष्कक:, रोगातें नाश करितो जो तो मुष्क तोच मुष्कक. त. मोरवा वृक्ष. अ. पु.

मुष्टि: मुष्यतेनयामुष्टि:, जीच्या योगानें चोरी होत्ये ती. क्र. मुषधा. स्तेयअ. मूठ. इ. स्त्री. पु.

मुष्टिबंध: मुष्टेर्बंध: मुष्टिबंध:, मुष्टीचाजोबंधतो. स. मुठींत धरू येणें. अ. पु.

मुसलं मुस्यति अनेनमुसलं, विदलन होतें जेणें करून तें. क्र. मुसधा. खंडन अ. मुसळ. अ. पु.

मुसली मुसलमस्यास्तीतिमुस

ली, मुसल आहे आयुध ज्याचें तो.
त. बलराम. इन्. पु. २ मुसळके
द ३ पाल. ई. स्त्री.

मुसल्यः मुसलेनवध्योमुसल्यः,
मुसलानें जो वधाई तो. त. मुस
लानें मारण्यास योग्य. वि. अ.
पु. न. आ. स्त्री.

मुस्तकं. मुस्ता मुस्तयंत्यनेने
तिमुस्तकं, रोग नाश पावता होत
जाणें तो. कृ. मुस्तधा. संगीत्अ.
मोथा. अ. पु. २आ. स्त्री.

मुहुर्भाषा मुहुः पुनः पुनर्भाष
णमुहुर्भाषा, वारंवार जें
बोलणें तें. कृ. भाषधा. अव्यक्त
वाणिअ. बहुत शोक युक्त जें भा
षणा ती. आ. स्त्री.

मुहुः मोहनंमुहुः, अविवेकता जी
तें. कृ. मुहधा. वैचित्यअ. पुनः पु
नः ह्याअर्थी अव्य.

मुहूर्तः मुहुर्मुहुरियर्तीतिमुहूर्तः,
वारंवार गमन करितो जो तो. कृ.
ऋधा. गतिअ. बारासण. अ. पु.

मूकः मूमितिकायतिमूकः, मूषा
प्रकारें करून शब्द करितो जो
तो. कृ. कैधा. शब्दअ. मूका. वि

अ. पु. न. आ. स्त्री.

मूढः मुह्यतीतिमूढः, अविवेक
पावतो जो तो. कृ. मुहधा. वैचि
त्यअ. मूर्ख. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूतं मूयतेस्ममूतं, बंधन करि
जेलें जें तें. कृ. मूङ्धा. बंधनअ.
बांधलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूत्रं मूत्र्यतेतन्मूत्रं, प्रस्रावि
जेतें जें तें. कृ. मूत्रधा. प्रस्रा
वअ. मूत. अ. न.

मूत्रकृच्छ्रं मूत्रेकृच्छ्रंमूत्रकृच्छ्रं,
मूत्राविषयीं जें महद्दुःख तें. स.
रोगविशेष. अ. पु.

मूत्रितं मूत्र्यतेस्ममूत्रितं, प्रस्रा
व करिजेलें जें तें. कृ. मूत्रधा. प्र
स्रवणअ. मुतलेलें. वि. अ. पु.
न. आ. स्त्री.

मूरर्वः मुह्यतीतिमूरर्वः, अविवेक
करितो जो तो. कृ. मुहधा. वैचित्य
अ. विचारशून्य. वि. अ. पु. न.
आ. स्त्री.

मूर्च्छा मूर्च्छनंमूर्च्छा, मोह जो
ती. कृ. मूर्च्छाधा. मोहअ. मूर्च्छ
ना. आ. स्त्री.

मूर्च्छालः मूर्च्छास्यस्यमूर्च्छा

लः, मूर्च्छा आहे जास तो. त. मूर्च्छित. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूर्च्छितः मूर्च्छासंजातास्यमूर्च्छितः, मूर्च्छा झाली आहे जास तो. त. मूर्च्छाल. २ मोहित. ३ उंच वाढलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूर्णं मूर्व्यतेस्ममूर्णं, बंधन करिजेलें जें तें. क्र. मुर्वीधा. हिंसाअ. बांधलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूर्त्तं मूर्च्छतिस्ममूर्तं, निबिड झालें जें तें. क्र. मुर्च्छाधा. मोहसमुच्छ्रायअ. कठीण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूर्तिः मूर्च्छतीतिमूर्तिः, उन्नती पावणारी जी ती. क्र. मुर्च्छाधा. समुच्छ्रायअ. देह. २ काठिण्य. इ. स्त्री.

मूर्तिमान् मूर्तिः काठिण्यमस्यास्तीतिमूर्तिमान्, काठिन्य आहे जास तो. त. कठिण. वि. त. पु. न. ई. स्त्री.

मूर्धा मुह्यंत्यस्मिन् आहतेइति मूर्धा, ताडन केलें असतां मोह पावतात ज्याचेठायीं तो. क्र. मुह्धा. वैचित्यअ. मस्तक. न. पु.

मूर्धाभिषिक्तः मूर्धनि अभिषिच्यतेमूर्धाभिषिक्तः, राज्यदानसमयाचे ठायीं ज्याचा मस्तकावर अभिषेक करिजेतो तो. स. क्षत्रिय. २ राजा. ३ प्रधान. अ. पु.

मूर्वा मूर्व्यतिसामूर्वा, बंधन करिते जी ती. क्र. मुर्वीधा. बंधनअ. मुरवेल. आ. स्त्री.

मूलं मूलतीतिमूलं, प्रतिष्ठित होतें जें तें. क्र. मूलधा. प्रतिष्ठाअ. वृक्षादिकाचें मूळ. २ आद्य प्रकृति. ३ वृक्षाचें पाळ. ४ मूलनक्षत्र. अ. न.

मूलकं मूलतीतिमूलकं, भूमीचेठायीं स्थित जो तो. क्र. मूलधा. प्रतिष्ठाअ. मुळा. अ. न.

मूलधनं मूलंचतद्धनंचमूलधनं, मूल जें धन तें. स. ऋणाव ऋणादि व्यवहारांतील मूलधन अ. न.

मूल्यं मूलेनानाम्यंमूल्यं, मूळें करून जें प्राप्य तें. त. मोल. २ वेतन. अ. न.

मूषक: मूषतीतिमूषकः, चौर्य करितो जो तो. कृ. मूषधा. स्तेयअ. उंदीर. अ. पु.

मूषा विग्रहादिसर्वमुषाशब्दाप्रमाणें.

मूषिक: मुष्णातीतिमूषिकः, अर्थादिमूषक शब्दाप्रमाणें. उंदीर. अ. पु.

मूषिकपर्णी मूषकःपर्णमस्या इतिमूषिकपर्णी, मूषककर्ण सदृश. आहेत पानें जीचीं ती. स. उंदीरकानी. ई. स्त्री.

मूषित विग्रहादिमुषितशब्दाप्रमाणें. चोरलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मूषी विग्रहादिमुषीशब्दाप्रमाणें. मूस.

मृग: मृग्यते व्याधेनेतिमृगः, व्याधानें शोधिजेतो जो तो. कृ. मृगधा. अन्वेषणअ. हरिण. २ हरिणादिश्वापद जाति. ३ शोधणें. ४ मृगशीर्षनक्षत्र. अ. पु.

मृगणा मृगणंमृगणा, अन्वेषण जें ती. कृ. मृगधा. अन्वेषणअ. शोधणें. आ. स्त्री.

मृगतृष्णा मृगाणांतृष्णामृगतृष्णा, मृगांची जी तृष्णा ती. स. मृगजळ. आ. स्त्री.

मृगद्विट् मृगान्द्वेष्टीतिमृगद्विट्, हरिणातें द्वेष करितो जो तो. कृ. द्विषधा. अप्रीतिअ. सिंह. ष. पु.

मृगधूर्तक: मृगेषुधूर्तइवमृगधूर्तकः, मृगांचेठायीं जो चतुर सदृश तो. त. कोल्हा. अ. पु.

मृगनाभि: मृगस्यनाभिर्मृगनाभिः, मृगाचा जो नाभि तो. स. कस्तूरी. इ. पु.

मृगवधाजीव: मृगवधेनआजीवतीतिमृगवधाजीवः, मृगाच्या वधें करून जीवन करितो जो तो. कृ. जीवधा. प्राणधारणअ. पारधि. अ. पु.

मृगबंधनी मृगोबध्यते ऽनयामृगबंधिनी, मृगबंधन करिजेतें जीणें ती. कृ. बंधधा. बंधनअ. जाळें. ई. स्त्री.

मृगमद: मृगस्यमदोमृगमदः, मृगाचा जो मद तो. स. कस्तूरी तो. स. कस्तूरी. अ. पु.

मृगया मृग्यंतेत्रमृगया, शोध करिजेतात मृग जीचेठायीं ती. क्र. मृगधा. अन्वेषणअ. शिकार. आ. स्त्री.

मृगयुः मृगान्यातीतिमृगयुः, वधार्थ मृगांप्रत गमन करितो जो तो. क्र. याधा. प्रापण अ. व्याध. उ. पु.

मृगरिपुः मृगाणांरिपुः मृगरिपुः, मृगांचा जो शत्रु तो. स. सिंह. उ. पु.

मृगव्यं मृगाव्ययंत्यत्रमृगव्यं, ज्याचेठायीं मृग गमन करितात तें. क्र. अयधा. गतिअ. शिकार. अ. न.

मृगशिरः मृगःशिरोयस्यमृगशिरः, मृगाकृती आहे शिर ह्म. प्रदेशजाचा तो. स. मृगशिरनक्षत्र. स. न.

मृगांकः मृगः अंकः चिन्हंयस्य मृगांकः, मृग आहे चिन्ह जाचें तो. स. चंद्र. अ. पु.

मृगादनः मृगान्अत्तीतिमृगादनः, मृगांतें भक्षण करितो जो तो. क्र. अदधा. भक्षणअ. श्वापद विशेष, तरस. अ. पु.

मृगाशनः मृगान्अश्नातीति मृगाशनः, मृगांतें भक्षण करितो जो तो. क्र. अशधा. भक्षणअ. सिंह. अ. पु.

मृगितं मृग्यतेस्ममृगितं, शोध करिजेलें जें तें. क्र. मृगधा. अन्वेषणअ. शोधलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मृगेंद्रः मृगाणांइंद्रोमृगेंद्रः, मृगांचा जो स्वामी तो. स. सिंह. अ. पु.

मृजा विग्रहादिमार्ष्टिशब्दाप्रमाणें. प्रोक्षणादिकें करून देह पवित्र करणें, मार्जन. आ. स्त्री

मृडः मृडयतिसुखयतीतिमृडः, लोकांस सुखी करितो जो तो. क्र. मृडधा. सुखनअ. महादेव. अ. पु.

मृडानी मृडस्यस्त्रीमृडानी, मृडह्म. शंकर त्याची जी स्त्री ती. स्त्री प्र. पार्वती. ई. स्त्री.

मृणालं मृण्यतेभक्ष्यतेतन्मृणालं, भक्षण करिजेतें जें तें. क्र. मृणधा. हिंसाअ. भिसें. अ. पु. न.

मृतः म्रियतेस्ममृतः, प्राणत्याग करि तो जो तो. कृ. मृङ्धा. प्राणत्यागअ. यद्वा मरणंमृतं. तंदुला दियाञ्चा जी ती. था. पू. प्र. मेले ला. वि. अ. पु. न. आ. स्त्री. २ भिक्षा याञ्चा. अ. न.

मृतस्नातः मृतेस्नातोमृतेस्नातः. मृतो द्देशें करून जो स्नात तो. स. मृतो द्देशें करून स्नान केलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मृतालकं मृतमालयतीतिमृतालं मृतालमेव मृतालकं, नित्य याञ्चेतें पर्याप्त करितें जें तें मृताल तेंच मृतालक. त. मसूर. अ. न

मृत्तालकं मृत्तालः प्रतिष्ठायस्य मृत्तालकं, मृत्तिका आहे प्रतिष्ठा स्थ. स्थिति ज्याची तो. स. तूर. अ. नपुंस.

मृत्तिका मृदेवमृत्तिका, मृत्जी तीच मृत्तिका. त. माति. आ. स्त्री

मृत्युः मरणंमृत्युः, मरण जें तो. कृ. मृङ्धा. प्राणत्यागअ. मरण. उ. पु. स्त्री.

मृत्युंजयः मृत्युंजयतीतिमृत्युंजयः, मृत्यूतें जिंकितो जो तो. कृ. जिधा. जयअ. महादेव. अ. पु.

मृत्सा प्रशस्तामृत्मृत्सा, प्रशस्त जी मृत्तिका ती. त. चांगली माती. आ. स्त्री.

मृत्स्ना विग्रहादिसर्वमृत्साशब्दा प्रमाणें.

मृदंगः मृद्यतइतिमृदंगः, मर्दन करिजे तो जो तो. कृ. मृद्धा. क्षोदअ. पखवाज. अ. पु.

मृदु मृद्यतइतिमृदु, चूर्ण करिजे तें जें तें. कृ. मृद्धा. क्षोदअ. कोमल. २ अतितीक्ष्ण. वि. उ. पु. स्त्री. न.

मृदुत्वक् मृदुत्वगस्येतिमृदुत्वक्, मृदु आहे त्वचा ज्याची तो. स. भूर्जवृक्ष. च. पु.

मृदुलं मृदुर्गुणोस्यास्तीतिमृदुलं, मृदु गुण आहे ज्यास तें. त. कोमल. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मृद् मृद्यतइतिमृत्, मर्दिली जाते जी ती. कृ. मृद्धा. क्षोदअ. मृत्तिका. द. स्त्री.

मृद्वीका मृद्नातीतिमृद्वीका, फलद्वारा भक्षणाविषयीं आतुर करिते जी ती. कृ. मृद्धा. क्षोद

अ. द्राक्षीचा वेल. आ. स्त्री.

मृध्रं मर्दनंमृध्रं, परस्पर जें हिंसन तें. क्रु. मृधुधा. हिंसाअ. संग्राम छ्या. युद्ध. अ. न.

मृषा मृष्यतइतिमृषा, असत्य सहन करिजेतें जें तें. क्रु. मृषुधा. सहनअ. मिथ्याच्या अर्थी अव्य.

मृष्टं मृज्यतेस्ममृष्टं, शुद्ध करिजेलें जें तें. क्रु. मृजूधा. शुद्धिअ. निर्मळ छ्या. शुद्ध केललें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मेकलकन्यका. मेखलकन्यका मेकलादेःकन्यकामेकलकन्यका, मेकलक पर्वताची जी कन्या ती. स. नर्मदा नदी. आ. स्त्री.

मेखला मांलक्ष्मीं इंखतीतिमेखला, लक्ष्मीप्रत गमन करिते जी ती. क्रु. इखधा. गतिअ. कमरपट्टा. २ तरवार, कटार, खंजीर इत्यादिकांचें मुठीस जें चामडाचें बंधन ती. आ. स्त्री.

मेघः मेहतीतिमेघः, सेचन करितो जो तो. क्रु. मिहधा. सेचनअ. मेघ. अ. पु.

मेघज्योतिः मेघानांज्योतिर्मेघज्योतिः, मेघसंबंधि अन्योन्य संघट्टानें निष्पन्न जें तेज ती. स. वीज. इ. पु.

मेघपुष्पं मेघस्यपुष्पमिव मेघपुष्पं, मेघाचें पुष्प सदृश जें उदक तें. स. उदक. २ विष्णूचा घोडा. अ. न.

मेघनादानुलासी मेघनादेन अनुलसतितच्छीलः मेघनादानुलासी, मेघनादानें क्रीडा स्वभाव जो तो. क्रु. लसधा. क्रीडाअ. मोर. इन्. पु.

मेघनामा मेघस्यनामान्यस्यमेघनामा, मेघांचीं आहेत नामें जास तो. स. नागर मोथा. न्. पु.

मेघमाला मेघानांमालामेघमाला, मेघांची जी माला ती. स. मेघमंडळ. आ. स्त्री.

मेघवाहनः मेघान्वाहयतीतिमेघवाहनः, मेघांप्रत वाहवितो जो तो. क्रु. वहधा. प्रापणअ. इंद्र. अ. पु.

मेचकः मेचकःश्यामलवर्णोस्यास्तीतिमेचकः, श्यामल आहे वर्ण जास तो. त. काळे गोकर्णीचें फुला सारिखा जो रंग तो. किंवा मोराचे कंठा सारिखा जो रंग तो. २ मोरा

चे पिसावर जें नेत्राकार चिन्ह तो· अ· पु·

मेढ्रः मेहत्यनेनमेढ्रः, सेचन करिजेतो जेणेंकरून तो· कृ· मिहधा· सेचनअ· शिश्न· २ एडका· अ· पु·

मेदकः मेद्यतीतिमेदकः, स्नेहन करितो जो तो· कृ· ञिमिदाधा· स्नेहनअ· सुराकल्क· अ· पु·

मेदः मेद्यतीतिमेदः स्नेहकरणा रा जो तो· कृ· ञिमिदाधा· स्नेहन अ· मांसजन्यस्नेह· ज्यास चरबी मांदें असें ह्मणतात तें· स· न·

मेदिनी मेद्यतीतिमेदिनी, मेद्यति स्नेहयुक्त होत्ये जी ती· वृत्या दि पूर्वीच्या शब्दाप्र· पृथ्वी· ई· स्त्री·

मेदुरः मेदनशीलोमेदुरः स्नेहनस्वभाव जोतो· इ· पू· प्र· निबिड· अ· पु· न· आ· स्त्री·

मेधा मेधतेसर्वमनुभूतेअस्या मितिमेधा, सर्व अनुभूत स्न जा णलें जातें जीचेठायीं ती· कृ· मेधृधा· मेधादिअ· धारणविशिष्टबुद्धि· आ· स्त्री·

मेधिः मेध्यंतेपशवोत्रमेधिः, जा चेठायीं पशु बांधलेला जातो तो· कृ· मेधृधा· संगमअ· पशूस बांधण्यास पुरलेलें काष्ठ ज्यास मेद असें ह्मणतात तो· इ· पु·

मेध्यं मेधितुंयोग्यंमेध्यं, पवित्र करण्याविषयीं जें योग्य तें· कृ· मेधृधा· संगमादिअपवित्र· वि· अ· पु· न· आ· स्त्री·

मेरुः मिनोतिउच्चत्वात्ज्योतींषीतिमेरुः, नक्षत्रादि मोजण्यासजो साधन तो· कृ· माङ्धा· मानअ· पर्वत विशेष· उ· पु·

मेलकः मेलनंमेलः सएवमेलकः, संगम जो तो· कृ· मिलधा· संश्लेषअ· १ल· संगम· अ· पु·

मेला मेलतीतिमेला, वस्त्रादिकाला संश्लिष्ट होत्ये जी ती· कृ· मिलधा· संश्लेषअ· नीळ· आ· स्त्री·

मेषः मिषतीतिमेषः, स्पर्द्धा करितो जो तो· कृ· मिषधा· स्पर्द्धाअ· मेषराश· २ मेंढा· अ· पु·

मेषकंबलः मेषलोमकृतः कंबलः मेषकंबलः, मेषाच्या लोमानीं केला जो कंबल तो· स· कांबळें अ· पु·

मेहः मेहतीतिमेहः, क्षरतो जो

तो. कृ. मिहधा. सेचनअ. मूत्र रोग. अ. पु.

मेहनं विग्रहादिमेहशब्दाप्रमाणें. शिश्न. अ. न.

मैत्रावरुणिः मित्रावरुणयोः सूनुर्मैत्रावरुणिः, मित्रावरुणांचा जो पुत्र तो. त. अगस्तिऋषि. २ वाल्मीकऋषि. इ. पु.

मैत्री मित्रस्यकर्मभावोवामैत्री, मित्राचें जें कर्म तें. त. स्नेह. ई. स्त्रीलिंगी.

मैत्र्यं विग्रहादिमैत्रीशब्दाप्रमाणें. मैत्री. अ. न.

मैथुनं मिथुनस्यकर्ममैथुनं, स्त्रीपुरुषांचें जें कर्म तें. त. सुरत. २ भार्यादिकांचा संबंध. अ. न.

मैरेयं मिरायांदेशविशेषेभवंमैरेयं, देशविशेषाचे ठायीं उत्पन्न जें तें. त. उसाचे रसापासून जाहलेलें मद्य. २ धातकीपुष्प. अ. न.

मोक्षः मोचयतिरोगमितिमोक्षः, भवरोगातें नाश करितो जो तो. कृ. मुच्लृधा. मोक्षणअ. मुक्ति. २ मोरव्याचें झाड. अ. पु.

मोघं मुह्यंत्यस्मिन्मोघं, लोक मोह पावतात ज्याचेठायीं तो. कृ. मुहधा. वैचित्यअ. निरर्थक. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मोघा मोहयतीतिमोघा, मदनाविर्भावें करून मोह करवितेजी ती. कृ. मुहधा. वैचित्यअ. पाटलिवृक्ष. २ वावडिंगाचें झाड. आ. स्त्री.

मोचकः मोचयतीतिमोचकः, रोगातें नाश करितो जो तो. कृ. मुच्लृधा. मोक्षणअ. शेवग्याचें झाड. अ. पु.

मोचा मुंचतिरसमितिमोचा, रस मोचक जी ती. कृ. मुच्लृधा. मोक्षणअ. सांवरीचें झाड. २ केळ. आ. स्त्री.

मोदकः मोदयतेइतिमोदकः, हर्षित करितो जो तो. कृ. मुदधा. हर्षअ. भक्ष्यविशेष. अ. पु. २ आनंदकारक. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मोरटं मोरटा मुरतीतिमोरटं. रसव्यापि जें तें. कृ. मुरधा. वेष्टनअ. उसाचें मूळ. २ मुरवेल. अ. न. २ आ. स्त्री.

मोषकः मुष्णातीतिमोषकः, चो

शं करोतीति जो तो. कृ. मुषधा. स्तेय अ. चोर. अ. पु.

मोहः मोहनंमोहः, अविवेक जो तो. कृ. मुहधा. वैचित्य अ. मूर्च्छा अ. पु.

मौक्तिकं मुक्तैवमौक्तिकं, मुक्ता जी तेंच. त. मोतीं. अ. न.

मौद्गीनं मुद्गानांभवनंक्षेत्रंमौद्गीनं, मुद्ग होण्याचें जें क्षेत्र तें. त. मुगाचें शेत. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

मौनं मुनेः कर्मभावोवामौनं, मुनीचें जें कर्म किंवा भाव तें. त. मौनक्ष. उगें राहणें. अ. न.

मौरजिकः मुरजवादनंशिल्पमस्यमौरजिकः, मुरज वादनआहे शिल्प ज्याचें तो. त. मृदंग वाजविणारा. अ. पु.

मौर्वी मूर्वायाविकारोमौर्वी, मूर्वा नामक वल्लीचा जो विकार ती. त. धनुष्याची दोरी. ई. स्त्री.

मौलिः मूलस्यादूरभवोमौलिः, मूळाचा अदूर जो भव तो. त. शिखा, शेंडी. २ मुगुट. ३ बांधलेले केश, बुचडा. इ. पु.

मौहूर्तः मुहूर्तंवेदमौहूर्तः, मुहूर्तातें जाणतो जो तो. त. ज्योतिषी, जोशी. अ. पु.

मौहूर्तिकः विग्रहादिसर्वमौहूर्तशब्दाप्रमाणें.

म्लेंछदेशः म्लेंछानांदेशःम्लेंछदेशः, म्लेंछांचा जो देश तो. स. चातुर्वर्ण्यव्यवस्था ज्यादेशीं नाहीं असा जो देश तो. अ. पु.

म्लेंच्छमुखं म्लेंछदेशेमुखमुत्पत्तिर्यस्यम्लेंछमुखं, म्लेंच्छ देशाचेठायीं आहे उत्पत्ती ज्याची तो. समासवृत्ति. ताम्रक ह्मणजे तांबें. अकारांत. नपुंसक लिंगीं.

यकृत् यमनंयं संयमंकरोतीति यकृत् उपरम करणारें जें तें. कृ. डुकृञ्धा. करणअ. दक्षिणकुक्षिस्थ मांस पिंड विशेष. त्. न.

यक्षः यक्ष्यतेपूज्यतइतियक्षः, कामानिक लोकांनीं पूजिजेलाजो तो. कृ. यक्षधा. पूजाअ. कुबेर. २ देव योनि विशेष. अ. पु.

यक्षकर्दमः यक्षप्रियःकर्दमो यक्षकर्दमः, यक्षांला प्रियजोकर्पूरादिकांचा कर्दम तो. स. कापूर, कृष्णागरु, कस्तूरी चंदन, केशर. हे पदार्थ एक ठिकाणीकुटून केलेला महासुगंधिद्रव्य. अ. पु.

यक्षधूपः यक्षान्धूपयतीतियक्षधूपः, यक्षातें संताप करणारा जो तो. कृ. धूपधा. संतापअ. राळधूप. अ. पु.

यक्षराट् यक्षेषुराजतइतियक्षराट्, यक्षामध्यें शोभतोजो तो. कृ. राजृधा. दीप्तिअ. कुबेर. ज्. पु.

यक्ष्मा यक्ष्यतेइतियक्ष्मा, कृष्यादिकानें पूजिजेतोजोतोकृ. यक्षधा. पूजा अ. क्षयरोग. न. पु.

यजमानः विग्रहादियक्षाशब्दाप्रमाणें. यागाविषयीं ऋत्विजांस आज्ञा करणारा. अ. पु.

यज्वा यजतेस्मइतियज्वा, विधी करून यजन करिता झाला जो तो. कृ. यजधा. देवपूजादिअ. विधिपूर्वक जाणें याग केला तो. न्. पु.

यज्ञः इज्यतेनेनात्रवायज्ञः, यजन करिजेतें जाच्येठायीं किंवा जेणें करून तो. कृ. यजधा. देवपूजादिअ. अध्वर, याग. अ. पु.

यज्ञपुरुषः यज्ञफलदः पुरुषोयज्ञपुरुषः, यज्ञाचें फल देणाराजो तो. स. विष्णु. अ. पु.

यज्ञांगः यज्ञमंगतीतियज्ञांगः, यज्ञाप्रत गमन करितो जो तो. कृ. अगिधा. गतिअ. उंबराचें झाड. अ. पु.

यज्ञीयं यज्ञमर्हतियज्ञीयं, यज्ञकर्माप्रत योग्य होणारें जें तें. त. यज्ञकर्मास योग्य. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

यतः यस्मादितियतः, ज्याकारणास्तव म्हणणारें तें. त. हेतुन कारण याअर्थी अव्य.

यती यमनंयतं यतमुपरतोनित्य मस्यास्तीतियती, नित्य इंद्रियां ची शांति आहे ज्याची तो. कृ. यम धा. उपरमअ. संन्यासी. इन्. पु.

यत् यच्छतीतियत्, कारण उ परम पावतें जें तें. कृ. यमधा. उ परमअ. कारण याअर्थी अव्य.

यंता यच्छतीतियंता, नियमनक रितोजो तो. कृ. यमधा. उपरमअ. सारथि. ऋ. पु.

यथा येनप्रकारेणयथा, ज्याप्र कारें करूनजेंतें. सादृश्यार्थी अव्य.

यथाजातः जातंजन्मकालम नतिक्रम्यवर्ततेइतियथाजातं, तदस्यास्तीतियथाजातः, जन्म कालिक चेष्टा आहे ज्यास तो. त. मूर्ख. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

यथातथं तथासत्यमनतिक्र म्ययथातथं, सत्याप्रत अतिक्र मण न करणारें जें तें. स. सत्या र्थक याअर्थी अव्य. उ. गुरुर्य थातथंवक्ति.

यथायथं यथार्थंयथायथं, स त्यार्थक जें तें. स. यथायोग्य या अर्थी अव्य.

यथार्थं अर्थमनतिक्रम्ययथा र्थं, अर्थाप्रत अतिक्रमण न क रणें जें तें. स. सत्यार्थी अव्य.

यथार्हवर्णः विग्रहादिअनुव र्तन शब्दाप्रमाणें. चार पुरुष, बा तमीदार. अ. पु.

यथास्वं यथाययंयथास्वं, य था योग्य जें तें. स. यथायोग्ययया अर्थी अव्य.

यथेप्सितं आप्तुमिष्टमीप्सितं, ईप्सितमनतिक्रम्ययथेप्सितं, ई प्सिताचें अनतिक्रमणजेंतें. स. यथे च्छ. अ. न.

यदि यततेइतियदि, पक्षांतर रूपार्थाविषयीं यत्न करितें जें तें. कृ. यतीधा. प्रयत्नअ. पक्षां तर या अर्थी अव्य. उ. मुनिम नोयद्यस्तितीर्थेनकिं.

यदृच्छा ऋच्छनंऋच्छा, याचा सोऋच्छाचयदृच्छा, स्वातंत्र्यजें तें. कृ. ऋच्छधा. गत्यादिअ. स्वेच्छा, स्वतंत्रता. आ. स्त्री.

यंत्रं यंत्रयतितयंत्रं, यंत्रयत्नने नवायंत्रं, संकुचित होतें अथवा बांधिजेतें जेणें तो. कृ. यंत्रिधा. सं

कोचनअ. मृगबंधन विशेष. २ मंत्र. अ. न.

यम: यमयतीतियमः, प्राणिमात्रानें नियमन करितो जो तो. कृ. यमधा. उपरमअ. किंवा यम्यतेनेनयमः, नियमन करिजेतें जेणें करून तो. कृ. यमधा. उपरमअ. शरीर मात्रें करून साध्य व नित्य कार्य जें तो. २ प्रेतांचा राजा यम तो. ३ इंद्रिय निग्रह. अ. पु.

यमराट् यमेनसंयमेनराजतइतियमराट्, इंद्रिय निग्रहानें शोभतो जो तो. कृ. राजृधा. दीप्तिअ. प्रेतपति जो यम तो. ज्. पु.

यमनिका यमयतीतियमनिका, शांती करणारी जी ती. कृ. यमधा. उपरमअ. पडदा, कनांत. आ. स्त्री.

यमुना यच्छतीतियमुना, स्वर्गादिकांतें देते जी ती. कृ. यमधा. उपरमअ. यमुना नदी. आ. स्त्री.

यमुनाभ्राता यमुनायाः भ्राता यमुनाभ्राता, यमुना जी तिचा जो भ्राता म्ह. बंधु तो. स. यम. ऋ. पु.

ययु: यातीतिययुः, अश्वमेधांत पृथ्वीच्याठायीं गमन करणारा जो तो. कृ. याधा. प्रापणअ. अश्वमेधयज्ञास जो उपयुक्त अश्व तो. उ. पुल्लिंगीं.

यव: यौतीतियवः, होमादिकाचे ठायीं उपयुक्त होतो जो तो. कृ. युधा. मिश्रणादिअ. जव धान्य. अ. पु.

यवक्यं यवकानांभवनंक्षेत्रंयवक्यं, यव विशेष होण्याचें जें क्षेत्र तें. त. ल. हान यव उत्पन्न होण्याचें शेत. जें तें. स. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

यवक्षार: यवानांक्षारोयवक्षारः, यवांचा जो खार तो. स. जवखार. अ. पु.

यवफल: यवइवफलान्यस्ययवफलः, यवासारिखें आहे फल ज्याचें तो. स. वेकू. अ. पु.

यवसं यूयतेइतियवसं, भक्षण करिजेतें जें तें. कृ. युधा. मिश्रणअ. पशूचें भक्ष्य, तृण. अ. न.

यवागू: यूयतेइतियवागूः, मिश्रण करिजेते जी ती. कृ. यूधा. मिश्रणअ. कण्हेरी. ऊ. स्त्री.

यवाग्रज: यवाग्राज्जायतेस्मयवाग्रजः, यवाग्रापासून झाला जो तो. कृ. जनीधा. प्रादुर्भावअ. ज

वखार. अ. पु.

यवानिका दुष्टोयवोयवानी, यवानीवयवानिका, दुष्ट ह्म. उग्र जो यव ती यवानी तीचे प रीजीती. त. यवानिका, त. ओवा. आ. स्त्री.

यवानी दुष्टोयवोयवानी, दुष्ट जो यव ती. अर्थादि पूर्वीच्या श ब्दाप्रमाणें. ई. स्त्री.

यवासः यौतीतियवासः, औ षधार्थ उपयुक्त होत्ये जी ती. कृ. युधा. मिश्रणाअ. धमासा. अ. पु.

यविष्ठः अतिशयेनयुवायविष्ठः अतिशयें करून जो लहान तो. त. कनिष्ठबंधु. अ. पु.

यवीयान् अतिशयेनयुवायवी यान्, अतिकनिष्ठ जो तो. त. धा कटा भाऊ. स. पु.

यव्यं यवानांभवनंक्षेत्रंयव्यं, य व होण्याचें जें क्षेत्र तें. त. यवउ त्पन्न होण्याचें शेत. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

यशःपटहः यशसेपटहः यशः पटहः, यशार्थ जें वाद्य तें. स. ट क्का, वाद्य. अ. पु.

यशः यातीतियशः, देशांतरप्रा प्त गमन करितें जें तें. कृ. याधा. प्रापणाअ. कीर्ति. स्. न.

यष्टा यजतेइतियष्टा, याग कर णारा जो तो. कृ. यजधा. देवपूज नादिअ. यजमान. ऋ. पु.

यष्टिः यक्षयतइतियष्टिः, रक्षण करित्ये जी ती. कृ. यक्षधा. पूजा अ. काठी. इ. स्त्री.

यष्टिमधुकं यष्टीमधुवास्यय ष्टिमधुकं, यष्टी ह्म. कांडी आहे मधु सारिखी ज्याची तें. स. ज्ये ष्ठमध. अ. न.

यागः इज्यतेनेनयागः, पूजन होतें जेणेंकरून तो. कृ. यजधा. देवपूजनादिअ. यज्ञ. अ. पु.

याचकः याचतीतियाचकः, या चना करितो जो तो. कृ. टुयाचृ धा. याञ्चाअ. याञ्चा करणारा. अ. पु.

याचनकः याचयतीतियाचनः, सएवयाचनकः, याचना करितो जो तो. धा. पू. श. प्र. अ. पु.

याचना याचनंयाचना, याचन जें तें. कृ. डुयाचृधा. याञ्चाअ.

याञ्चा. आ. स्त्री.

याचितकं याचितेननिर्वृत्तंया चितकं, याञ्चे करून जें संपादित तें. जायां आणिलेले जिन्नस. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

याञ्चा याचनंयाञ्चा, याचना करणें जी ती. कृ. डुयाचृधा. याञ्चा. याचना. आ. स्त्री.

याजकः यजतीतियाजकः, यजन करणारा जो तो. कृ. यजधा. देवपूजादिअ. ऋत्विज. अ. पु.

यातना यथानाशंयातीतियातना, जीणें करून नाशाप्रत पावतो ती. कृ. याधा. प्रापणअ. नरकपीडा. आ. स्त्री.

यातयामं यातोगतोयामोउपभोगकालोस्ययातयामं, गेलाआहे याम किंवाउपभोगकालज्याचातो. स. जीर्णप्राप्त परिणाम. २ परिभुक्त भोगून टाकलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

यातु यातीतियातु, अकस्मात् जें प्राप्त होतें तें. कृ. याधा. प्रापणअ. राक्षस. उ. न.

यातुधानः यातूनिरक्षांसिदधातीतियातुधानः, राक्षसांचें पोषण करितो जो तो. कृ. डुधाञ्धा. धारण, पोषणअ. राक्षस. अ. न.

याता यततेइतियाता, यत्न करणारी भर्त्याच्या भावाची जी स्त्री ती ह्मणजे जाऊ जी ती. कृ. पतीधा. प्रयत्नअ. बंधुबंधूच्या भार्या, परस्पर जावा. ऋ. स्त्री.

यात्रा यानंयात्रा, यानजें ती. कृ. याधा. प्रापणअ. प्रयाण. २ गमनसाधन. ३ देवपूजेचा उत्साह. आ. स्त्रीलिं.

यादःपतिः यादसांपतिर्यादःपतिः, जलचरांचा जो स्वामी तो. स. समुद्र. इ. पु.

यादसांपतिः यादसांपतिर्यादसांपतिः, जलचरांचा जो स्वामी तो. स. वरुण. इ. पु.

यादः यातिवेगेनेतियादः, त्वरेनें गमन करितो जो तो. कृ. याधा. प्रापणअ. जलजंतु. स. न.

यानं यात्यत्रयेनवायानं, जातो ज्याविषयीं किंवा जेणें तें. कृ. याधा. प्रापणअ. शत्रूस जिंकण्याच्या इच्छेनें जाणें. २ हत्ती घोडे इत्यादि वाहन. अ. न.

यानमुखं यानस्यमुखंयानमुखं, यानाचा जो पुरोभाग तें. रथादिकांचा अग्रभाग, धुर. अ. न.

याप्यः याप्यतइतियाप्यः, कुत्सित गमन करिजे तो जो तो. क्र. याधा. प्रापणअ. निकृष्ट, निंद्य. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

याप्ययानं याप्यैरधमैर्यानंयाप्ययानं, नीचांनीं नेणारें जें यान तें. स. यान विशेष, पालखी. अ. न.

यामः यातीतियामः, शीघ्र निघून जातो जो तो. क्र. याधा. प्रापणअ. प्रहर. २ योगाचा साधन विशेष. अ. पु.

यामिः यातीतियामिः, शीघ्र गमन करणारी जी ती. क्र. याधा. प्रापणअ. बहीण. २ कुलस्त्री. इ. स्त्रीलिंगी.

यामिनी यामाः संत्यस्याइति यामिनी, याम म्ह. प्रहर जे ते आहेत जीस ती. त. रात्रि. ई. स्त्री.

यामुनं यमुनायाइदंयामुनं, यमुना वर्णसदृश जें तें. त. सुरमा. अ. न.

यायजूकः पुनःपुनर्यजतेसौ यायजूकः, वारंवार याग करितो जो तो सना. यजधा. देवपूजादिअ. वारंवार यज्ञकरणारा. अ. पु.

यावः यूयतेइतियवः सएवयावः, मिश्रित करिजे तो जो तो. क्र. युधा. मिश्रणअ. लाख. अ. पु.

यावकः यूयतेइतियावः सएवयावकः, मिश्रण करिजे तो जो तो. क्र. युधा. मिश्रणअ. अर्धशिजे यव, घुगऱ्या. २ धान्य विशेष. अ. पु.

यावत् यत्परिमाणमस्येतियावत्, यत्परिमाणआहे ज्यास तें. साकल्य. २ निश्चय. ३ अवधि. ४ परिणाम त्याअर्थीं अव्य.

यावनः यवनदेशेभवोयावनः, यवन देशाचे ठायीं जो उत्पन्न तो. त. ऊद लोबान. अ. पु.

याष्टीकः यष्टिःप्रहरणमस्ययाष्टीकः, यष्टि आहे शस्त्र जाचें तो. त. दांडेवाला. अ. पु.

यासः यसनंयासः यासोस्यस्येतियासः, रक्षणाविषयीं प्रयत्न आहेजाचा तो. त. धमासा. अ. पु.

युक्तं युज्यतेस्मयुक्तं, योजना करिजे तें जें तें. क्र. युजिर्धा. योग

अ. न्याय्य. २सहित. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

युक्तरसा युक्तोरसोयस्याःसा युक्तरसा, युक्त आहे रस जीचा ती. स. कोलिंदण. आ. स्त्री.

युगं युज्यतेइतियुगं, युक्त करि जेतें जें तें. कृ. युजिर्‌धा. योग अ. चार युगें प्रत्येक. २युग्म. ३ रथादिकांचा अवयव विशेष. ४ चार हात प्रमाण. ५औषध. अ. न.

युगकीलकः युगस्यकीलकोयु गकीलकः, युग ह्म. जूं तत्सं बंधीं जो कीलक ह्म. खिळा तो. स. खिळा. अ. पु.

युगंधरः युगंधारयतीतियुगंध रः, बंधन काष्ठातें धारण करणा रा जो तो. कृ. धृञ्‌धा. धारणअ. रथादिकांच्या काष्ठास घोडे व बै ल बांधितात तें काष्ठ ज्यास दां डी असें ह्मणतात तें. अ. पु. न.

युगपत्रकः युगंयुग्मंपत्रमस्ये तियुगपत्रकः, दोनआहेत पत्रें जास तो. स. कांचनवृक्ष. अ. पु.

युगपत् युवंत्यस्मिन्नितियुगप त्, एकसमयावच्छेदें करून भि न्न होतात ज्याचेठायीं तो. कृ. युधा. मिश्रणअ. एककालीं त्या अर्थी. उ. युगपद्‌द्वाहताः अव्य.

युगपार्श्वगः युगस्यपार्श्वेगच्छ तीतियुगपार्श्वगः, स्कंद काष्ठाच्या पार्श्व भागातें गमन करितो जोतो. कृ. गम्लृधा. गतिअ. जे नवे बैल वटणीस घेण्या करितां त्यांच्या स्कंधावर जूं ठेवून फिरवितात ते प्रत्येक. अ. पु.

युगलं युगंलातीतियुगलं, युग ग्रहण करणारा जो तो. कृ. लाधा. आदानअ. युग्म. अ. न.

युग्मं युज्यतेइतियुग्मं, युक्त होइ जेतें जें तें. कृ. युजिर्‌धा. योगअ. द्वय. अ. न.

युग्यं युज्यतेअनेनयुग्यं, संयु क्त होइ जेतें जेणें अथवा जूं वाह तो जो तो. कृ. युजिर्‌धा. योगअ. हत्ती घोडे इत्यादिवाहन सामान्य. २जूं वाहणारा जोत्या बैल. अ. न.

युद्धं योधनंयुद्धं, सम्यक् परस्पर प्रहार जो तें. कृ. युधधा. संप्रहार अ. लढाई. अ. न.

युध् योधनंयुध्, सम्यक् जो प्रहार

ती. कृ. युधधा. संप्रहारअ. लढा
ई. ध. स्त्री.

युवतिः युवती यौतीतियुवतिः
उपयुक्त होणारी तरुण स्त्री जी ती.
कृ. युधा. मिश्रणादिअ. तरुण
बायको. इ. २ई. स्त्री.

युवा यौतीतियुवा, मेळन करणा
रा जो तो. कृ. युधा. मिश्रणादि
अ. तरुण पुरुष. नृ. पु.

यूथं यौतीतियूथं, गमन करणा
रें जें तें. कृ. युधा. मिश्रणअ. स
जातीय पाण्यांचा समुदाय. उ. मृ
गयूथं. अ. न.

यूथनाथः यूथस्यनाथोयूथना
थः, हस्ति समुदायाचा जो स्वा
मी तो. स. यूथांमध्यें मुख्य. अ.
पुल्लिंगी.

यूथपः यूथंपातीतियूथपः, ग
ज समूहातें संरक्षण करणारा
जो तो. कृ. पाधा. रक्षणअ. यूथां
मध्यें मुख्य. अ. पु.

यूथिका यूथमस्त्यस्याइतियू
थिका, पुष्पादि समुदाय आहे जी
स ती. त. जुईचें झाड. आ. स्त्री.

यूपः युवंत्यनेनेतियौतीतिवायू
पः, मिश्रित होइजेताहेत जेणें क
रून अथवा उपयुक्त होइजे तो जो
तो. कृ. युधा. मिश्रणअ. पारसा
पिंपळ. अ. पु. २ छिन्न रक्त. अ. पु.
न. ३ यज्ञांगस्तंभ. अ. न.

यूपकटकः यूपस्याग्रेकृतः कट
काकारो यूपकटकः, यूपाचे अग्र
भागाचे ठायीं वलया सारिखा जो
तो. त. यज्ञांगस्तंभावर केलेला
वलयाकार काष्ठविकार. अ. पु.

यूपाग्रं यूपस्याग्रंयूपाग्रं, यज्ञस्तं
भाचें जें अग्र तें. स. यज्ञस्तंभाचें
अग्र. अ. न.

यूषं यूषतीतियूषं, द्रवयुक्त पदा
र्थावर संबंध जो तो. कृ. यूषधा.
बंधनअ. मडनिवळी. अ. न.

योक्त्रं युज्यतेऽनेनयोक्त्रं, संबद्ध
करिजेतें जेणें करून तें. कृ. युजि
रधा. योगअ. जोकड बांधण्याची
दोरी. अ. न.

योगः योजनंयोगः, युक्ती जी तो.
कृ. युजिरधा. योगअ. कवच. २ उ
पाय. ३ ध्यान ४ संगति. ५ युक्ती.
अ. पु.

योगेष्टं योगेइष्टंयोगेष्टं, धातुसं

बंधानें गायीं जें इष्ट तें. स. शिलें. अ. न.

योग्यं युज्यते तद्योग्यं, औषधार्थं योजिजेतें जें तें. क्र. युजिर् धा. योगअ. मुरड शेंग. अ. न. सांप्रतचें ३ अनुरूप. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

योजनं युज्यतेतद्योजनं, आत्मस्वरूपीं किंवा चारकोशानें गायीं योजिजेतें जे तें. क्र. युजिर्धा. योजनअ. चार कोश. २परमात्मा. ३ अनुरूप. अ. न.

योजनपर्णी योजनपर्यंतंपर्णाविशिष्टवल्लीयस्याःसायोजनपर्णी एक योजन पर्यंत आहे पर्णयुक्त वल्ली जीची ती. स. मंजिष्टा. ई. स्त्री.

योजनवल्ली योजनगामिनीवल्लीयस्याःसायोजनवल्ली, योजन पर्यंत गमन करणारी आहे वल्ली जीची ती. स. मंजिष्ठा. ई. स्त्री.

योत्रं यूयतेनेनयोत्रं, मिश्र होतें जेणें करून तें. क्र. युधा. मिश्रणअ. जोकड बांधण्याची दोरी. अ. न.

योद्धृ विग्रहादियोधशब्दाप्रमाणें. क्र. पु.

योधः युध्यतेइतियोधः, शत्रूतें प्रहार करणारा जो तो. क्र. युधधा. संप्रहारअ. योद्धा. अ. पु.

योनिः यौतीतियोनिः, मिश्र करणारी जी ती. क्र. युधा. मिश्रणअ. स्त्रियांचें उपस्थ. २ कारण. इ. स्त्री.

योषा युष्यतेइतियोषा, अर्थाद् योषित्शब्दाप्रमाणें. बायको. आ. स्त्रीलिंगीं.

योषिता युष्यतेसायोषितासेविजेत्येइ. उपयुक्त करिजेत्ये जी ती. क्र. युषधा. सेवाअ. बायको. आ. स्त्री.

योषित् योष तीतियोषित्, सेवा करणारी जी ती. क्र. युषधा. सेवाअ. बायको. त्. पु. स्त्री.

यौतुकं यौतकं युतकंयुतकंवायोनिसंबंधस्तत्रभवंयौतुकं यौतकंवा, योनिसंबधानें मिळालें जें तें. त. कन्यादानकालीं दिलेलें द्रव्य. अ. न.

यौवतं युवतीनांसमूहोयौवतं, युवतींचाजो समुदाय तें. त. तरु

णस्थांचा समुदाय. २ मानपरिमाण. अ. न.

यौवनं यूनोभावोयौवनं, यौवन अवस्था जी ती. त. तारुण्य. अ. न.

(र.)

रक्तं रज्यतेइतिरक्तं, राग विशिष्ट करिजे तें जें तें. कृ. रंजधा. राग अ. अनुरक्त. २ रक्तवर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्री. ३ कुंकुम, तांबें. अ. नपुंस.

रक्तकः रक्तएवरक्तकः, रागविशिष्ट करिजेतो जो तो रक्त तोच रक्तक. त. दुपारीचा वृक्ष. अ. पु.

रक्तचंदनं रक्तंचतत् चंदनंच रक्तचंदनं, रक्त ह्म. आरक्त वर्ण असें जें चंदन तें. स. रक्तचंदन. २ पतंग. अ. न.

रक्तसंकोचपिशुनं रज्यतेतद्रक्तं संकुच्यते तत्संकोचं, रक्तसंकोचंच तत्पिशुनंचरक्त संकोच पिशुनं, रक्त वर्ण असें जें लेपिजे तें तें रक्त संकोच वक्त संकोच असें जें पिशुन ह्म. चंदन तें. स. कुंकुम. अ. न.

रक्तपा रक्तंपिबतीतिरक्तपा, रक्त पिणारी जी ती. कृ. पाधा. पानअ. जळू. आ. स्त्री.

रक्तफला रक्तंफलमस्यारक्तफला, रक्त वर्ण आहे फळ जीचें ती. स. तोंडलीची वेल. आ. स्त्री.

रक्तसंध्यकं रक्तसंध्येवरक्तसंध्यकं, संध्याकाळासारखें जें तें. त. तांबडें कमळ. अ. न.

रक्तसरोरुहं रक्तंचतत् सरोरुहंचरक्त सरोरुहं, आरक्त वर्ण जें कमल तें. स. तांबडें कमळ. अ. न.

रक्तांगः रक्तमंगमस्यरक्तांगः, रक्त वर्ण आहे अंग ज्याचें तो. स. शुंडा रोचनी. अ. पु.

रक्तोत्पलं रक्तंचतत् उत्पलंच रक्तोत्पलं, आरक्त वर्ण असें जें कमल तें. स. तांबडें कमळ. अ. नपुं.

रक्षः रक्षस्त्यस्मादितिरक्षः, संरक्षण करिताहेत ज्या पासून तें. कृ. रक्षधा. पालनअ. राक्षस. स. न.

रक्षःसभं रक्षसांसभारक्षःसभं, राक्षसांची जी सभा तें. स.

राक्षसाचें घर किंवा सभा. अ. पुल्लिंगीं.

रक्षा विग्रहादिरक्ष्याशब्दाप्रमाणें. भस्म. २ राक्षण. आ. स्त्री.

रक्षितं रक्ष्यतेस्मरक्षितं, रक्षण करिजेलें जें तें. कृ. रक्षधा. पालनअ. रक्षण केलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रक्षिवर्गः रक्षंत्यवश्यंरक्षिणः, रक्षिणांवर्गोरक्षिवर्गः, रक्षणकरणाऱ्यांचा जो समुदाय तो. स. राजादिकांचा रक्षण करणारा गण. अ. पु.

रक्ष्याः रक्षणंरक्ष्याः, रक्षण जें तो. कृ. रक्षधा. पालनअ. रक्षण. अ. पु.

रंकुः रमतेइतिरंकुः, क्रीडा करणारा जो तो. कृ. रमुधा. क्रीडाअ. मृगविशेष, चित्ता. उ. पु.

रंगं रंगतीतिरंगं, गमन करितें जें तें. कृ. रगिधा. गतिअ. कथिल. अ. पु. न.

रंगाजीवः रंगेणआजीवतीति रंगाजीवः, पीतादिरंगें करून जीवन पावतोजो तो. कृ. जीवधा. प्राणनअ. रंगारी. अ. पु.

रचना रच्यतेइतिरचना, गुणाधान जें तीं. कृ. रचधा. प्रतियत्नअ. अवयवांचा एकीभाव करणें. आ. स्त्री.

रजकः रंजयतीतिरजकः, वस्त्रावेगार्थी प्रीति करितो जो तो. कृ. रंजधा. रागअ. परीट. अ. पु.

रजतं रज्यतेअनेनरजतं, प्रीति करिजेते जेणें करून तें. कृ. रंजधा. रागअ. रुपें. २ सोनें. ३ शुभ्र. अ. न.

रजनिः रजनी रज्यंतेअनुरक्ताभवंतिरागिणोस्यामितिरजनिः, अनुरक्त होताहेत कामुक जनजीचाठायीं ती. कृ. रंजधा. रागअ. रात्री. २ चाकवत. इ. २ ई. स्त्री.

रजनीमुखं रजन्याःमुखंरजनीमुखं, रजनीचें जें मुख तें. स. प्रदोषकाल. अ. न.

रजः रंजयतितत्रज्यतेअनेनइतिवारजः, रंजित होतें किंवा दोषयुक्त करितें जेणें करून तें. कृ. रंजधा. रागअ. रजोगु

ण. २ धूळ. ३ स्त्रीरज. स्. न.

रजस्वला रजोस्त्यस्याइतिर जस्वला, रज आहे जीस ती. त. विटाळशी बायको. आ. स्त्री.

रज्जुः सृज्यतेइतिरज्जुः, त्या ग करिजेत्ये जी ती. कृ. सृजधा. विसर्गअ. दोरी. उ. स्त्री.

रंजनं रंजयतीतिरंजनं, मनो रंजन करितें जें तें. कृ. रंजधा. रागअ. रक्तचंदन. अ. न.

रंजनी रंजयतिसारंजनी, रं जन करित्ये जी ती. कृ. रंजधा. रागअ. नीळी नीळ. ई. स्त्री.

रणः रणनंरणः, परस्पर जेंबो लणें किंवा आक्रोश जो तो. कृ. रणधा. शब्दअ. युद्ध. अ. पु. न. २ शब्द करणें. ३ शब्द. अ. पु.

रंडा रमंतेअत्रेतिरंडा, रममा ण होताहेत कामुक जन जीचा ठायीं ती. कृ. रमुधा. क्रीडाअ. वेश्या. २ उंदीरकानी. आ. स्त्री.

रतं रमणंरतं, स्त्रीपुरुषांची जी क्रीडा तें. कृ. रमधा. क्रीडा अ. मैथुन. अ. न.

रतिपतिः रतेः पतिः रतिपतिः, रतीचा जो पति तो. स. मदन. इ. पु.

रत्नं रमंतेस्मिन्रत्नं, लोक रम माण होतात ज्याचेठायीं तें. कृ. र मुधा. क्रीडाअ. सोनें, हिरा, पा च, पोवळें, मोती हीं पांचरत्नें प्र त्येक. २ स्वजातिश्रेष्ठ. अ. न.

रत्नगर्भा रत्नानिगर्भेयस्याः सारत्नगर्भा, रत्नें आहेत गर्भा चेठायीं जीच्या ती. स. पृथ्वी. आ. स्त्री.

रत्नसानुः रत्नानिसानावस्ये तिरत्नसानुः, रत्नें आहेत शि खराचेठायीं ज्याच्या तो. स. मे रुपर्वत. उ. पु.

रत्नाकरः रत्नानामाकरःर त्नाकरः, रत्नांचा जो आकर ह्म. खनि तो. स. समुद्र. अ. पु.

रत्निः ऋच्छतीतिरत्निः, गम न करणारा जो तो. कृ. ऋधा. ग तिअ. मुंदाहात. इ. पु.

रथः रमंतेत्ररथः, राजे ज्याचे ठायीं रममाण होतात तो. कृ. रमधा. क्रीडाअ. रथ. २ वेत. अ. पु.

रथकट्या विग्रहादिरथ्याश ब्दाप्रमाणें. रथांचा समूह. आ. स्त्रीलिंगी.

रथकारः रथंकरोतीतिरथका रः, रथातें करितो जो तो. कृ. डु कृञ्धा. करणअ. करणजाती य स्त्रीचेठायीं माहिष्या पासून झालेलापुत्र. २ सुतार. अ. पु.

रथगुप्तिः रथस्यगुप्तिःरथगुप्तिः, रथाचें आवरण जें ती. स. श स्त्रादि ठेवण्यास व रक्षणार्थ र थास लोहादि मय जें आवरण असतें ती. इ. स्त्री.

रथद्रुः रथस्यद्रुःरथद्रुः, रथहो ण्याचा जो वृक्ष तो. स. तिवसा चें झाड. उ. पु.

रथव्रजः रथानांव्रजोरथव्रजः, रथांचा जो समुदाय तो. स. रथ समुदाय. अ. पु.

रथांगं रथस्यांगंरथांगं, रथा चा जो अवयव तो. स. रथाचा अवयव. २ चाक. अ. न. ३ चक्र वाक पक्षि. अ. पु.

रथिकः रथोस्तिअस्यरथिकः, रथ आहे जास तो. त. रथाचा स्वामी. अ. पु.

रथिनः रथस्येनःरथिनः, रथा चा जो स्वामी तो. स. रथाचा स्वा मी. अ. पु.

रथी रथोस्यास्तीतिरथी, रथ आ हे जास तो. त. रथावर बसून यु द्ध करणारा. २ रथाचा स्वामी. इन्. पुल्लिंगीं.

रथ्यः रथंवहतीतिरथ्यः, रथातें वाहणारा जो तो. त. रथ वाहणा रा घोडा. अ. पु.

रथ्या रथानांसमूहोरथ्या, रथां चा जो समूह तो. त. रथांचा स मूह. २ गांवांतील लाहान मार्ग. आ. स्त्री.

रदः रदतीतिरदः, भेदन करणा रा जो तो. कृ. रदधा. विलेखनअ दांत. अ. पु.

रदनः रद्यतेनेनरदनः, भेदन हो तें जेणें करून तो. कृ. रदधा. वि लेखनअ. दंत. अ. पु.

रदछदः रदनाश्छाद्यंतेनेनर दनछदः, दंत आच्छादित होता त जेणें करून तो. कृ. छदधा. सं वरणअ. ओंठ. अ. पु.

रंध्रं गतिरंधयतीतिरंध्रं, गमना तें नाश करवितें जें तें. कृ. रंधधा. हिंसाअ. छिद्र. अ. न.

रभसः रंभणंरभनेअनेनवार भसः, त्वरण किंवा त्वरा करि जेत्ये जेणें तो. कृ. रभधा. राभ स्यअ. वेग. २ हर्ष. अ. पु.

रमणं रमतेइतिरमणः, रमते स्मिन्वारमणः, रमतो किंवा रम तात जाचेठायीं तो. कृ. रमुधा. क्री डाअ. पति. अ. पु.

रमणा रमयतीतिरमणा, रम वित्येजीती. कृ. रमुधा. क्रीडाअ. रमविणारी बायको. आ. स्त्री.

रमणी रमयतिरम्यतेवारमणी, रमवित्ये किंवा रममाण होत्ये जी ती. कृ. रमुधा. क्रीडाअ. सुं दरस्त्री. ई. स्त्री.

रमणीयं रम्यतेइतिरमणीयं, रमण करिजेतें जें तें. कृ. रमु धा. क्रीडाअ. सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रम्यं रम्यतेइतिरम्यं, रमणक रिजेतें जें तें. कृ. रमुधा. क्रीडा अ. सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रंभा रंभतेवेगेनेतिरंभा, वेगा नें वाजत्ये जी ती. कृ. रभधा. राभ स्यअ. केळ. २ अप्सरा. आ. स्त्रीलिंगी.

रयः रयंत्यनेनेतिरयः, गमन करिताहेत जेणें करून तो. कृ. रयधा. गतिअ. वेग. अ. पु.

रल्लकः रमणंरत्‌रतंलातीति रल्लः सएवरल्लकः, रत म्ह. क्री डा तीतें ग्रहण करितो जो तो र ल्ल तोच रल्लक. त. कांबळेंअ. पु.

रवः रूयतेइतिरवः, रवण जें तो. कृ. रुधा. शब्दअ. शब्द. अ. पुल्लिंगी.

रवणः रवणशीलोरवणः, श ब्द स्वभावजो तो. कृ. रुधा. श ब्दअ. नादाचा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रविः रूयतेस्तूयतेसौतिइतिवा रविः, स्तविजेतो किंवा सदोदि त गमन करितोजो तो. कृ. रु धा. शब्दअ. २ रुङ्‌धा. गतिअ. सूर्य. इ. पु.

रशना रशतीतिरशना, शब्द करणारी जी ती. कृ. रशधा. श

दअ. जिव्हा. २ कमरपट्टा. आ. स्त्री.

रश्मिः अश्नुतेइतिरश्मिः, ते ज: प्रसाराने व्याप्तकरितो किं वासंधीभूतअसतो जो तो. कृ. अशुधा. व्याप्त्यादिअ. किरण. २ रज्जू. इ. पु.

रसः रस्यतइतिरसः, आस्वादन करिजेतोजो तो. कृ. रसधा. आस्वादनअ. शृंगारादिरस. २ रत्नबोळ. ३ पारा. ४ विष. ५ वीर्य. ६ तेज. ७ गोड, आंबटइत्यादिषड्रस. ८ प्रीति. अ. पु.

रसगंधः विग्रहादिगंधरसशब्दाप्रमाणें. रत्नबोळ. अ. पु.

रसगर्भं रसोगर्भेस्यरसगर्भं, रस आहे गर्भाचेठायीं ज्याच्या तें. स. दार्विकानामकवनौषधीच्या काढ्या पासून झालेलें अंजन. अ. न.

रसज्ञा रसंजानातीतिरसज्ञा, रस जाणणारीजी ती. कृ. ज्ञाधा. अवबोधनअ. जिव्हा. आ. स्त्री.

रसना रसयतीतिरसना, स्वाद घेणारीजी ती. कृ. रसधा. आस्वादनअ. जिव्हा. आ. स्त्री. अ. नपुं.

रसवती रसाः संत्यस्यांरसवती, अन्नादिरस आहेत जीच्येठायीं ती. त. स्वैपाकघर. ई. स्त्री.

रसा रसोस्यामस्तिरस्यतइतिवारसा, उदकरूप आहे रसजीचाठायीं ती. किंवा आस्वाद जेत्येजी ती. कृ. रसधा. आस्वादनअ. पृथ्वी. ई. स्त्री. २ पाडळी, पाहाडमूळ. ३ सालई. आ. स्त्री.

रसांजनं रसजमंजनंरसांजनं, रसापासोन उत्पन्न जें अंजन तें. स. दारुहळदीचे काढ्यांत सम भाग शेळीचें दूध घालून केलेलें अंजन. अ. न.

रसातलं रसायास्तलंरसातलं, पृथ्वीचें जें अधोभूत तें. स. पाताळ. अ. न.

रसालः रसमलतीतिरसालः, रसाप्रत प्राप्त जो तो. कृ. अलधा. पर्याप्तिअ. आम्रवृक्ष. २ ऊस. अ. पु.

रसाला रसानालातीतिरसाला, रस ग्रहण करणारी जीती. कृ.

लाधा. आस्वादनअ. श्रीखंड. आ. स्त्रीलिं.

रसितं रसनंरसितं, शब्दितजें तें. ह्र. रसधा. शब्दअ. मेघाची गर्जना. अ. न.

रसोनकः रसेआस्वादनेऊनय तीतिरसोनः, सएवरसोनकः, आस्वादनाविषयींदुःखितकरितो जो तोरसोन तोच रसोनक त. लसूण. अ. पु.

रहः रमंतेत्ररहः, ज्याचाठायीं लोक रममाण होतात तें. क्र. र मुधा. क्रीडाअ. एकांतस्थल. स्. न.

रंहः रंहत्यनेनेतिरंहः, गमनक रितो जेणेंकरून तें. क्र. रहिधा गतिअ. वेग. स्. न.

रहस्यं रहसिभवंरहस्यं, एकां ताचेठायीं झालें जें तें. त. एकां तस्थळीं जाहलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

राः रातिस्वरंराः, स्वरवदेतोजो तो. क्र. राधा. दानअ. द्रव्य. सो नें. आ. पु.

राका यज्वभीरायतिइतिराका, यज्वांनीं शब्दित करिजेत्ये जी तो. क्र. रैधा. शब्दअ. पूर्णचंद्र युक्त पौर्णिमा. आ. स्त्री.

राक्षसः रक्षांस्यस्यादितिराक्षसः, संरक्षण करिताहेत देवादिक जा पासून तो. क्र. रक्षधा. पालनअ. देवयोनि विशेष. २ साठ सं वत्सरांतील ४९ वा संवत्सर. अ. पु.

राक्षा रक्ष्यतअनयारक्षा, सैवरा क्षा, रक्षणकरिजेतें जीणें तीर क्षातीच राक्षा. त. लाख. आ. स्त्रीलिं.

राक्षसी राक्षसइयंराक्षसी, राक्ष साची जी स्त्री ती. स्त्रीप्र. राक्षासा ची बायको. २ किर्माणि ओवा. ई. स्त्रीलिंगी.

रांकवं रंकोर्भवंरांकवं, मृगाचेठा यीं उत्पन्नजेतें. त. मृगाच्या लो करे पासून जाहलेलें वस्त्र. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रागः रज्यतेनेनेतिरागः, अनु रक्त होतो जेणें तो. क्र. रंजधा. रा गअ. प्रीति. अ. पु.

राजकं राज्ञांसमूहोराजकं, रा जांचा जो समूह तें. त. राजांचा

समुदाय. अ. न.

राजा राजतीतिराजा, शोभणा राजो तो. रू. राजृधा. दीप्त्यर्थ. चं द्र. २राजा. ३ यम. ४ क्षत्रिय. ५ यक्ष. ६ इंद्र. न. पु.

राजन्यः राज्ञोपत्यंराजन्यः, रा जाचें अपत्य जें तो. त. क्षत्रिय. अ. पु.

राजन्यकं राजन्यानांसमूहोरा जन्यकं, क्षत्रियांचा जो समूह तो. त. क्षत्रियांचा समूह. अ. न.

राजन्वान् शोभतेराजाअस्यास्मि न्नितिराजन्वान्, उत्तम राजा आ हे ज्याचेठायीं तो. त. धर्मशीलव चांगला असा राजा ज्या देशांत आहे तो देश. वि. न. पु. न. ई. स्त्री.

राजराजः राज्ञांयक्षाणांराजारा जराजः, राजे जे यक्ष त्यांचा जो स्वामी तो. स. कुबेर. अ. पु.

राजवान् राजाअस्यास्तीतिराज वान्, राजा आहे ज्यास तो. त. राजसत्ता. वित्. पु. न. ई. स्त्री.

राजवंश्यः वंशेभवोवंश्यः रा ज्ञोवंश्योराजवंश्यः, वंशाचे ठायीं जो उत्पन्न तो वंश्य राजा चा जो वंश्य तो. स. राजवंशां त जाहलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

राजबला बलानांबलप्रदानां राजेवराजबला, बलप्रदजे त्यां स राजाचे परी जी ती. स. चांद वेल. आ. स्त्री.

राजबीजी राज्ञोबीजंराजबी जंतदस्यास्तीतिराजबीजी, रा जाचें जें बीज तें आहे ज्यास तें. त. राजवंश्यांत झालेला. वि. इ. पु. ई. स्त्री. इ. न.

राजवृक्षः राजाचासौवृक्षश्च राजवृक्षः, राजा म्ह. श्रेष्ठ अ सा जो वृक्ष तो. स. बाहाव्याचें झाड. अ. पु.

राजसदनं राज्ञः सदनंराज सदनं, राजाचें जें गृह तें. स. राजवाडा. अ. न.

राजसभा राज्ञःसभाराजसभा, राजाची जी सभा ती. स. राजा ची सभा. आ. स्त्री.

राजसूयः राजासोमःसूयते कंड्यतेऽत्रेतिराजसूयः, सोमव ल्ली कंडन करितात ज्याचेठायीं

तो. क्र. षुञ्धा. अभिषवअ. यागविशेष. अ. पु.

राजहंसः हंसानांराजाराजहंसः, रक्त वर्ण पाय व चंचु असा असून श्वेत वर्ण अशा हंसांचा जो राजा तो. स. हंसपक्षि. अ. पु.

राजादनः राजभिरद्यतेइतिराजादनः, राजांहीं भक्षण करिजे तो जो तो. क्र. अद्धा. भक्षणअ. चाराचें झाड. २ खिरणीचें झाड. अ. पु.

राजार्ह राजानमर्हतीतिराजार्हं, राजांतें योग्य होणारें जें तें. क्र. अर्हधा. पूजाअ. कृष्णागरु चंदन. अ. न.

राजिः राजतीतिराजिः, शोभा पावत्ये जी ती. क्र. राजृधा. दीप्तिअ. रेषा किंवा ज्यास अंतर नाहीं ती पंक्ति. इ. स्त्री.

राजिका राजतीतिराजिका, शोभणारी जी ती. क्र. राजृधा. दीप्तिअ. कृष्णसर्षप, मोहरी. आ. स्त्री.

राजिलः राजीलः राजिअस्तिअस्यराजिलः, रेखा आहे ज्यास तो. त. निर्विष सर्प, दुतोंडें अ. पुल्लिं.

राजीवः राजीअस्यास्तीतिराजीवः, रेखा आहे ज्यास तो. त. मत्स्यविशेष. अ. पु. २ कमळ. अ. पु. नपुं.

राट् विग्रहादि राजन् शब्दा प्रमाणें. राजा. ज. पु.

राज्यांगं राज्यस्यराजकर्मणोअंगंराज्यांगं, राज्यसंबंधीं जें कर्म त्याचें जें अंग तें. स. राज्याचीं सात अंगें आहेत तीं प्रत्येक. अ. न.

रात्रिः रातिददातिसुखमितिरात्रिः, सुखातें देत्ये जी ती. क्र. राधा. दानअ. सूर्य अस्ता पासून सूर्योदया पर्यंत जो काळ तो. इ. स्त्री.

रात्रिंचरः रात्रौचरतीतिरात्रिंचरः, रात्रीचेठायीं संचार करितो जो तो. क्र. चरधा. गतिअ. राक्षस. अ. पु.

राद्धांतः राद्धः सिद्धोंतोनिश्चयो यस्मिन्नितिराद्धांतः, सिद्ध आहे निश्चयजाचेठायीं तो. स. सिद्धांत. अ. पु.

राधः राधअत्रास्तिसराधः, राध

आहे ज्याचेठायीं तो. त. वैशाख मास. अ. पु.

राधा राध्नोतिकार्यमनयेतिरा धा, कार्य सिद्ध होतें जीणें ती. क्रु. राधधा. सिद्धिअ. विशाखा नक्षत्र. आ. स्त्री.

रामः रमंतेयोगिनोअस्मिन्नि तिरामः, रमताहेत योगी ज्याचे ठायीं तो. क्रु. रमुधा. क्रीडाअ. बलराम. २ दाशरथिराम. ३ प शुविशेष. ४ परशुराम. ५ रूपा नें सुंदर जो मृगविशेष तो. अ. पु. ६ नीलवर्ण. ७ सुंदर. ८ शुभ्र वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रामठं रमत्यनेनरामठं, रममा ण होतात जेणें करून तें. क्रु. र मुधा. क्रीडाअ. हिंग. अ. न.

रामणीयकं रम्यतेइतिरमणी यं रमणीयमेवरामणीयं राम णीयमेवरामणीयकं, त. सुंद र. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रामा विग्रहादिरामशब्दाप्रमा णें. रमविणारी बायको. आ. स्त्री.

रांभः रंभायाः वर्णोविकारोरांभः वेणूचा विकार जो दंड तो. त. संन्यासादि व्रताचेठायीं ग्राह्य जो वेळूचा दंड तो. अ. पु.

रालः रातिदुःखंरालः, दुःख दे णारा जो तो. क्रु. राधा. दानअ. राळ. अ. पु.

राशिः अश्नुतेइतिराशिः, संघात करणारा जो तो. क्रु. अशूधा. सं घातअ. धान्यादिकाची रास. २ मेषादि बारा राशि. इ. पु.

राष्ट्रः राजतेइतिराष्ट्रः, शोभतो जो तो. क्रु. राजृधा. दीप्तिअ. दे श. २ मरणादिक उपद्रव. अ. पु.

राष्ट्रिका राष्ट्रमस्त्यस्याइतिराष्ट्रि का, राष्ट्र आहे जीस ती. त. रिंग णि. आ. स्त्री.

राष्ट्रीयः राष्ट्री राज्ञीतस्याभ्राता राष्ट्रीयः, राणीचा जो भाऊ तो. त. राजाच्या बायकोचा भाऊ. अ. पु.

रासभः रासतीतिरासभः, शब्द करितो जो तो. क्रु. रासृधा. शब्द अ. गर्दभ. अ. पु.

रास्ना रातीतिरास्ना, सुख दे ते आरोग्यत्वानें जी ती. क्रु. राधा. दानअ. एलापर्णी. आ. स्त्री.

राहुः रहतिगृहीत्वात्यजतिचंद्र सूर्याविति राहुः, चंद्रसूर्यांप्रत ग्रहणकरून सोडितोजो तो. क. रहधा. त्यागअ. नवग्रहांतील एकग्रह. उ. पु.

रिक्तकं रिच्यतेस्मरिक्तकं, रिक्त करिजेलें जें तें. क. रिचधा. वियोजनादिअ. रिक्तामा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रिक्थं रिच्यतेइतिरिक्थं, विभक्त करिजेतें जें तें. क. रिचधा. विवेचनादिद्रव्य, धन. अ. न.

रिंगणं रिंखणं रिंग्यतेइति रिंगणं, गमनजें तें. क. रिगि धा. गतिअ. धर्मादिकांपासून चलन. २ हाता पायांनीं जें बालकाचें गमन तें. अ. न.

रिपुः रपतिदोषमितिरिपुः, दोष बोलणाराजो तो. क. रपधा. व्यक्तवाक्‌अ. शत्रु. उ. पु.

रिष्टं रेषतिइतिरिष्टं, हिंसा करितें जें तें. क. रिषधा. हिंसाअ. अशुभाभाव. २ कल्याण. ३ अमंगल. अ. न.

रिष्टिः रेषतीतिरिष्टिः, हिंसाकरणारा जो तो. क. रिषधा. हिंसाअ. तलवार. इ. पु.

रीढा रिहयतिकथयतीतिरीढा, अनादराविषयीं कथन करितेजी ती. क. रिहधा. कत्थनादिअ. अनादर. आ. स्त्री.

रीणं रीयतेस्मरीणं, प्रस्रवणझालें जें तें. क. रीङ्धा. प्रस्रवणअ. प्रस्नुत स्रवलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रीतिः रीणातीतिरीतिः, गमनकरित्येजी ती. क. रीधा. गतिअ. पितळ २ लोकाचार. ३ प्रस्ताव. इ. स्त्री.

रीतिपुष्पं रीतेः पुष्पमिवतन्मयत्वाद्रीतिपुष्पं, रीती स्त्र. पितळ तिला जें पुष्पासारखें तें. स. जस्ताचें फूल. अ. न.

रीती विग्रहादिरीतिशब्दाप्रमाणें. ई. स्त्री.

रुक्प्रतिक्रिया रुजः प्रतिक्रिया रुक्प्रतिक्रिया, रोग निरसन करणारी जी ती. स. रोग घालविणें. आ. स्त्री.

रुक्मं रोचतेइतिरुक्मं, दीप्तिकरितेंजें तें. क. रुचधा. दीप्तिअ. सोनें. अ. न.

रुक्मकारकः रुक्मंकरोतीति रुक्मकारः, सएवरुक्मकारकः, स्वर्णकर्ताजो तो. त. सोनार. अ. पुल्लिंगीं.

रुक्षः रूक्षः रुक्षयतीतिरुक्षः कठोर किंवा निःस्नेह होतोजो तो. कृ. रुक्षधा. पारुष्यअ. प्रेम रहित. २ अचिक्कण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रुग्णं रुज्यतेस्मरुग्णं, भंग करिजेलें जें तें. कृ. रुजोधा. भंगअ. व्यथित. २ मोडलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रुचकं रोचतेइतिरुचकं, जठराग्नीचें उद्दीपक जें तें. कृ. रुचधा. दीप्त्याद्य. एरंडाचें झाड. २ माहळुंगाचें झाड. अ. पु. २ संचकखार. अ. न.

रुचिः रोचनंरुचिः, दीप्ति किंवा अभिलाषजो ती. कृ. रुचिधा. दीप्त्यादिअ. कांति. २ स्पृहा. ३ किरण. ४ शोभा. इ. स्त्री.

रुचिरं रुच्यतेइतिरुचिरं, प्रीतियुक्त जें तें. कृ. रुचधा. दीप्त्यादिअ. सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्री

रुच्यं विग्रहादि पूर्वींच्या शब्दाप्रमाणें. सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिंगी.

रुजा विग्रहादिरुक्शब्दाप्रमाणें. रोग. आ. स्त्री.

रुक् रुजतिदेहमितिरुक्, देहाचा नाश करणारीजी ती. कृ. रुजोधा. भंगअ. कांति. २ रोग. ज. स्त्री.

रुट् विग्रहादिरोषशब्दाप्रमाणें. रोग. ह. स्त्री.

रुतं रवणंरुतं, रवणजें तें कृ. रुधा. शब्दअ. पक्ष्यांचा शब्द. अ. न.

रुदितं रुद्यतेइतिरुदितं, अश्रुविमोचनजें तें. कृ. रुदिर्धा. अश्रुविमोचनअ. रोदन. अ. न.

रुद्धं रुध्यतेस्मरुद्धं, आवरण करिजेलें जें तें. कृ. रुधिर्धा. आवरणअ. वेढलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

रुद्रः रोदयत्यसूरानितिरुद्रः, असुरजे त्यांप्रत रडवितो जो तो. कृ. रुदिर्धा. अश्रुविमोचनअ. महादेव. अ. पु.

रुद्राणी रुद्रस्यस्त्रीरुद्राणी, रुद्राचीजी पत्नी ती. स्त्रीप्र. पार्वती.

ई. स्त्री.

रुधिरं रुध्यतेइतिरुधिरं, व्या सि करि तें जें तें. क्र. रुधिरधा. आवरणअ. रक्त. २ कुंकुम. अ. न. ३ मंगळ नामा ग्रह. अ. पु.

रुरुः रौतीतिरुरुः शब्द करितो जो तो. क्र. रुधा. शब्दअ. मृगविशेष. धुवार. उ. पु.

रुशत् रुशतिकल्याणमितिरुश त्, कल्याण नाश कारी जीवाणी ती. क्र. रुशधा. हिंसाअ. अमंग ल वचन त. पु. न. ई. स्त्री.

रुहा रोहतीतिरुहा, व्याप्त करि त्ये जी ती. क्र. रुहधा. विजजन्मा दिअ. दूर्वा. आ. स्त्री.

रूपं रूप्यतिविमोहयतीतिरूपं, मोह करितें जें तें. क्र. रुपधा. वि मोहनअ. सदृश, सारखा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रूप्यं आहतंरूपमस्यरूप्यं, मु द्रित आहे रूप ज्याचें तें. त. रुपें २ नाणें. अ. न. ३ प्रशस्तरूपी, स्व रूप सुंदर. ४ सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रूप्याध्यक्षः रूप्यस्याध्यक्षोरू प्याध्यक्षः, रजताचा जो अध्यक्ष तो. स. रुप्याच्या कामाचा काम दार. अ. पु.

रूषितं रूष्यतेस्मरूषितं, वेष्ट नाविषयीं शोभित जाहलें जें तें. क्र. रूषधा. भूषाअ. गुंडाळले ला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रेचनी रेचयतीतिरेचनी, वियो जन करित्ये जी ती. क्र. रिचिरधा. वियोजनअ. श्वेत निशोत्तर. २ गुंडा रोचनी. ई. स्त्री.

रेचितं रेचनंरेचितं, गतिविषयीं पृथक्करणजें तें. क्र. रुचधा. सं पर्चनादिअ. घोड्याची दुडकी चा ल. अ. न.

रेणुः रिणातीतिरेणुः, गमन कर णारा जो तो. क्र. रीधा. गतिअ. धू ळ. उ. पु. स्त्री.

रेणुकः रेणुरिवरेणुकः, रेणूचे परी जो तो. त. वाराणा. अ. पु.

रेणुका रेणुरेवरेणुकः सअस्ति यस्याः सारेणुका, रजजें तोच रे णुक तो आहे जीस ती. त. सुवा सिक द्रव्यविशेष. आ. स्त्री.

रेतः रीणातीतिरेतः, चंचल हो

तें जें तें. क्रू. रीधा. गतिअ. रेत. सृ. न.

रेप: रीणातीतिरेपः, निंद्याविषयीं शब्द करितो जो तो. क्रू. रीधा. गतिरेषणअ. निंद्य. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

रेफ: रिफतीतिरेफः, कुत्सिता विषयीं विकत्थन करितो जो तो. क्रू. रिफधा. कत्थनादिअ. निंद्य २ कुत्सित. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिंगीं.

रेवतीरमण: रेवत्याःरमणः रेवतीरमणः, रेवतीचा जो रमण ह्म. पति तो. स. बलराम. अ. पु.

रेवा रेवतेविंध्याद्रौजातारेवा, विंध्याद्रिपर्वताचे ठायीं जी उत्पन्न ती. नर्मदा नदी. आ. स्त्री.

रोकं रूयतेइतिरोकं, स्वगत प्राणिमुखवानें शब्द करिजेलें जें तें. क्रू. रुधा. शब्दअ. छिद्र. अ. न.

विघ्नः विहननंविघ्नः, अंतराय जो तो. कृ. हनधा. हिंसादिअ. अंतराय, विघ्न. अ. पु.

विघ्नराजः विघ्नानांराजाविघ्नराजः, विघ्नांचा जो स्वामी तो. स. गणपति. अ. पु.

विचक्षणः विचष्टेइतिविचक्षणः स्पष्ट बोलणारा जो तो. कृ. चक्षिङ्धा. व्यक्तवाणीअ. पंडित. अ. पु. २ चतुर, शाहाणा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विचयनं विचयोविचयनं, अन्वेषण जें तें. कृ. विञ्धा. चयनअ. शोधणें. अ. पु.

विचर्चिका विचर्चतीतिविचर्चिका, अंगाचा नाश करित्ये जी ती. कृ. चर्चधा. हिंसाअ. ओलीखरूज. आ. स्त्री.

विचारणा विचारणंविचारणा, विचारण जें ती. कृ. चरधा. असंशयअ. प्रमाणादिकें करून अर्थाचा विचार करणें. आ. स्त्री.

विचारितः विचार्यतेस्मविचारितः, विचार करिजेला जो तो. कृ. चरधा. गतिअ. विचारि. २ ज्याचा विचार केला तो. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विचिकित्सा विचिकित्सनंविचिकित्सा, विशेषें करून चिकित्सन जें ती. कृ. कितधा. रोगापनयनाद्यसंशय. आ. स्त्री.

विच्छंदकः विशिष्टान्छंदयतीतिविच्छंदकः, विशिष्टानें-

आच्छादित करितो जो तो. कृ. छदि धा. संवरणअ. विस्तीर्ण व सुंदर असा जो राजवाडा तो. अकां. पुल्लिंगी.

विच्छर्दकः विच्छर्दयतीतिविच्छर्दकः, संदीप्तिमान् असतो जो तो. कृ. च्छृदी धा. संदीपनअ. सुंदर राजवाडा. अ. पु.

विच्छायं वीनांपक्षिणांच्छायाविच्छायं, पक्ष्यांची जी छाया तें. स. पक्ष्यांची छाया. अ. न.

विच्छित्तिः विच्छेदनंविच्छित्तिः, द्वैधीकरणजें ती. कृ. छिदिर् धा. द्वैधीकरणअ. स्त्रियांचाएक प्रकारचा हाव आहे. २ज्ञान. इ. स्त्री.

विजनः विगतोजनोयस्माद्विजनः, गेला आहे लोक जा पासून तो. स. एकांत स्थल. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विजयः विजयनंविजयः, पराभिभव जो तो. कृ. जिधा. जयअ. जय. अ. पु.

विजिलं विजिनंविजिः, विजिं लातीति विजिलं, प्रसरणस्वभाव जो तें. कृ. विजीधा. भयचलनअ. २लाधा. आदानअ. साई सुद्धां दहीं मट्ठा इत्यादि. अ. न.

विज्ञः विजानातीतिविज्ञः, सर्व जाणतो जो तो. कृ. ज्ञाधा. अवबोधनअ. प्रवीण. २कुशल. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विज्ञातः व्यज्ञायिविज्ञातः, जाणिजेला जो तो. कृ. ज्ञाधा. अवबोधनअ. प्रसिद्ध. २जाणलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विज्ञानं विशिष्टंविविधंवाज्ञानंविज्ञानं, विशिष्ट किंवा अनेक शिल्प शास्त्रीयज्ञान जें तें. स. शिल्प शास्त्रादिविषयक ज्ञान. अ. न.

विज्ञानिकः विज्ञानमस्त्यस्यविज्ञानिकः, विवेक ज्ञान आहे ज्यास तो. त. निपुण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विटः वेटतीतिविटः, आक्रोश करितो जो तो. कृ. विटधा. आक्रोशअ. धूर्त. २उंदीर. ३ खदिर वृक्ष. अ. पु.

विटकः विट्यतेनेनेतिविटकः, शब्द करितो जेणेंकरून तो. कृ. विटधा. शब्दअ. फोड. अका. पुल्लिं.

करितो जो तो. क्रु. विट्धा. आक्रोशअ. धूर्त. २ उंदीर. ३ खदिरवृक्ष. अ. पु.

विटकः विट्यतेनेनेतिविटकः, शब्द करिजेतो जेणें तो. क्रु. विटधा. शब्दअ. फोड. अ. पु.

विटंकं विशेषेणटंक्यंतेत्रविटंकं विशेषें करून शब्द करितात ज्याचेठायीं तें. क्रु. टकिधा. बंधनअ राजादिकांचे घरीं पक्ष्यां करितां केलेलें गृह. अ. पु. न.

विटपः विटपःशाखाविस्तारोस्यास्तीतिविटपः, शाखाविस्तार आहे ज्यास तो. त. वृक्षाचा विस्तार. २ तृणादिकांचा गुच्छ. अ. पु. न.

विटपी विटपाःसंत्यस्येतिविटपी, शाखा आहेत ज्यास तो. त. वृक्ष. इन्. पु.

विट्खदिरः विट्गंधिः खादिरः विट्खदिरः, विट्गंधि, असा जो खदिर तो. स. दुर्गंधिखदिरवृक्ष. अ. पु.

विट्चरः विशांविष्ठांचरतीति विट्चरः, विष्ठासंचारण करितो जो तो. क्रु. चरधा. गत्यादिअ. गांवडुकर. अ. पु.

विडंगः विडतीतिविडंगः, आक्रोश करितो जो तो. क्रु. विडधा. आक्रोशअ. माजर. अ. पु.

विडालः विडतीतिविडालः, आक्रोश करितो जो तो. क्रु. विडधा. आक्रोशअ. माजर अ. पु.

वितंसः वितंस्यतेइतिवितंसः, विशेषें करून मंडित करिजेला जो तो. क्रु. तसिधा. अलंकारअ. मृगपक्ष्यांस धरावयाचा पाश. अ. पु.

वितंडा वितंडतिपरपक्षोनयावितंडा, परपक्षोपमर्द होतो जीणें ती. क्रु. तडिधा. आघातअ. वादविशेष. आ. स्त्री.

वितथं विगतातथासत्यमस्मात् इतिवितथं, गेलें आहे सत्य जापासून तें. स. असत्य, खोटा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वितरणं वितीर्यतेइतिवितरणं, देइजेतें जें तें. क्रु. तृधा. प्लवनाद्य. दान. अ. न.

वितर्दिः विगतातर्दिर्हिंसास्याइतिवितर्दिः, निवृत्त आहे हिंसा

जी पासून ती. कृ. तर्दधा. हिंसा अ. अंगणामध्यें केलेलें उपवेश स्थान वेदी बहुलें इत्यादि. इ. स्त्री

वितस्तिः वितस्यतीतिवितस्तिः, उपक्षय करणारी जी ती. कृ. त स्कधा. उपक्षयअ. वीथ. इ. स्त्री.

वितानं वितन्यतइतिवितानं, विस्तीर्ण करिजेतें जें तें. कृ. तनु धा. विस्तारअ. चांदवा. अ. न. २ यज्ञ. ३ विस्तार. अ. पु. न. ४ शून्य. ५ मद. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

वितुन्नं वितुदतीतिवितुन्नं, विशेषें करून व्यथाकरितेजी ती. कृ. तुदधा. व्यथाअ. शाकविशेष, कुरडु. अ. न.

वितुन्नकः विगतंतुन्नंदुःखम स्मात्वितुन्नकं, गेलें आहे दुःख जापासून तो स. भुई आवळी. अ. पु. २ कोथिंबीर. ३ मोरचूत. अ. न.

वित्तं विद्यतेस्मवित्तं, लाभ करिजेतें जें तें. कृ. विद्धधा. लाभ अ. धन. अ. न. २ प्रख्यात. ३ ज्यास विचार आहे तो. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विदरः विदरणंविदरः, भेदन जें तो. कृ. दृधा. विदारणअ. द्विधाभाव. अ. पु.

विदलं विदलतितद्विदलं, विदलित होतें जें तें. कृ. दलधा. विदारणअ. वेळूच्या बेळांनीं केलेलें पात्र कणिंग रोवळी इत्यादि. २ डाळिंबाचा दाणा. अ. न.

विदारकः विदार्यतेइतिविदारकः, विदारण पावतो जो तो कृ. दृधा. विदारणअ. स्रू केलेल्या नदीमध्यें पाण्यासाठीं खटलेला खळगा. अ. पु.

विदारी विदार्याः मूलंविदारी, विदारीचें जें मूल तें. न. पांढरा भुय कोहाळा. ई. स्त्री.

विदारीगंधा विदार्याः गंधोवि दारीगंधः सोस्याअस्तीतिविदारीगंधा, विदारि गंध आहे जीस ती. न. सालपर्णी, सालवण. आ. स्त्री.

विदितं विद्यतेस्मविदितं, जाणिजेलें जें तें. कृ. विदधा. ज्ञानअ. जाणलेला. २ स्वीकार

शू. स्त्री.

विदुः वेत्तिसंज्ञामत्र घातेन विदुः, ज्याचेठायीं आघातानें सूचने प्रत पावतो जो तो. कृ. विद्धा. ज्ञानअ. हत्तीच्या गंडस्थळाच्या मध्यें जें अवकाशस्थान तो. उ. पुल्लिंगी.

विदुरः वेदनशीलो विदुरः, ज्ञानशील जो तो. कृ. विद्धा. ज्ञानअ. ज्ञाता. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

विदुलः विद्यतेइति विदुलः, जलाश्रयें करून असतो जो तो. कृ. विद्धा. सत्ताअ. वेत. अ. पुल्लिं.

विंदुः वेत्तितच्छीलो विंदुः, ज्ञानशील जो तो. कृ. विद्धा. ज्ञान अ. ज्ञाता. वि. उ. पु. स्त्री. न.

विद्धः विध्यतेस्म विद्धः, भेदन करिजेला जो तो. कृ. व्यधधा. ताडनअ. वेध पाडलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विद्धकर्णी विद्धः पर्णरूपः कर्णोअस्याइति विद्धकर्णी, विद्ध आहे पर्णरूप कर्ण जीचा ती. स. पाहाडमूळ. ई. स्त्री.

विद्याधरः विद्यायागुटिकांजनादिविषयिण्याधरो विद्याधरः, गुटिका अंजन इत्यादि विद्येचें धारण करितो जो तो. स. देवविशेष. अ. पु.

विद्युत् विशेषेण द्योतते विद्युत्, विशेषें करून कांतिमती जी ती. कृ. द्युतधा. दीप्तिअ. विद्युल्लता. त्. स्त्री.

विद्रधिः विद्रं वेदनां धीयतेस्यामिति विद्रधिः, वेदना धारण करित्ये जीच्याठायीं ती. कृ. डुधाञ्धा. धारणअ. उदर गाल कान इत्यादिकांवर जो फोड होतो तो रोग. इ. स्त्री.

विद्रवः विद्रवणं विद्रवः, अर्थादि संद्रावशब्दाप्रमाणें. पलायन, पळणें. अ. पु.

विद्रुतः विद्रूयतेस्म विद्रुतः, द्रवीभूत करिजेला जो तो. कृ. द्रुधा. गतिअ. द्रवीभूत. २ पातळ. ३ पळालेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विद्रुमः विशिष्टद्रोभवो विद्रुमः, विशिष्ट वृक्षाचेठायीं जो उत्पन्न तो. त. रत्नविशेष, पोवळें. अ. पु.

विद्रुमलता विद्रुमस्येवलताविं

द्रुमलता, विद्रुमाचे सारखि जीलता ती. स. स्त्रवाभिक द्र व्यविशेष ज्यास पवारी असें ह्मणतात ती. आ. स्त्री.

विद्वान् वेत्तीतिविद्वान्, जाणणारा जो तो. कृ. विदधा. ज्ञानअ. पंडित. २ज्ञाता. वि. स. पु. ई. स्त्री. त्. न. ३ आत्मज्ञ. स. पु.

विद्वेषः विद्वेषतीतिविद्वेषः, वैर जें तो. कृ. द्विषधा. अप्रीतिअर्थ. वैर. अ. पु.

विधवा विगतोधवोयस्याइति विधवा, गेला आहे भर्ता जीचा ती. स. जीचा नवरा मेला ती बायको. आ. स्त्री.

विधा विधानंविधा, समृद्धी जी ती. कृ. डुधाञ्धा. धारणअ. प्रकार. २ समृद्धि. ३ विधान ४ वर्तन. आ. स्त्री.

विधाता विशेषेणदधातीतिविधाता, विशेषें करून पोषण करितो जो तो. कृ. डुधाञ्धा. पोषणअ. ब्रह्मदेव. ऋ. पु.

विधिः विधत्तइतिविधिः, विश्वातें करितो जो तो. कृ. डुधाञ्धा. धारणअ. ब्रह्मदेव. २ देव. ३ शास्त्रोक्त. ४ नियोग शास्त्रविधि. ५ विधान, कर्तव्य. इ. पु.

विधुः विध्यतिविरहिणांविधुः, विरही पुरुषातें किरणानि ताडन करितो जो तो. कृ. व्यधधा. ताडनअ. विष्णु. २ कापूर. ३ चंद्र. ४ राक्षस. उ. पु.

विधुतं विधूयतेस्मविधूतं, त्यक्त करिजेलें जें तें. कृ. धुधातु. विधूननअ. टाकलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विधुननं विधुतिर्विधुननं, कंपन जें तें. कृ. धुञ्धा. कंपनअ. कांपणें. अ. न.

विधुंतुदः विधुंतुदतीतिविधुंतुदः, चंद्रातें व्यथा करितो जो तो. कृ. तुदधा. व्यथनअ. राहुनामा ग्रह. अ. पु.

विधुरं विगताधूः कार्यभागोयस्मिन्तद्विधुरं, गेला आहे कार्यभाग ज्याचे ठायीं तें. स. अत्यंत वियोग. २ विकल. अ. न.

विधुवनं विधूतिर्विधुवनं, कंप

नजें तें. कृ. धूधा. विधूननअ.

विधुननं विधूतिर्विधूननं, कंपनजें तें. कृ. धूञ्धा. कंपनअ. कांपणें. अ. न.

विधेयः विधातुंशक्योविधेयः, प्रवृत्तिनिवृत्तीचेठायीं धारणकरण्यास जो शक्य तो. कृ. डुधाञ्धा. धारणअ. वचनांत राहणारा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विनयग्राही विनयंगृहीतुंशीलमस्यविनयग्राही, नम्रताग्रहण करितो जो तो. कृ. ग्रहधाउपादानअ. वचनांत राहणारा. वि. इन्. पु. ई. स्त्री. इ. न.

विना विविगतमितिविना, विगत क्ष. वांचून एतदर्थकजें तें. त. वर्जनार्थक. अव्य. उ. क्षणमप्युत्सहतेनमांविना.

विनायकः विशिष्टोनायकोविनायकः, विशिष्ट असाजो नायक तो. स. गणपति. २ बुद्ध. ३ गरुड पक्षी. अ. पु.

विनाशः विनशनंविनाशः, अदर्शनजें तो. कृ. णशधा. अदर्शनअ. नाश. २ अदर्शन. अ. पु.

विनिमयः विनिमयतेसविनिमयः, मोबदला होतो जो तो. कृ. मेङ्धा. प्रणिदानअ. मोबदला. अ. पु.

विनीतः व्यनायि विनीतः, विशेषेंकरून नेयिजेला जो तो. कृ. णिञ्धा. प्रापणअ. नम्र. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विंध्यः इध्यतेसोविंध्यः, दीप्तिमान होतो जो तो. कृ. ञिइंधीधा. दीप्तिअ. विंध्यपर्वत. अ. पु.

विन्नः विद्यतेस्मविन्नः, विचार करिजेलाजो तो. कृ. विदधा. विचारणअ. निवारी. २ मिळालेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विपक्षः विरुद्धपक्षोस्यविपक्षः, विरुद्ध आहे पक्ष ज्याचा तो. स. शत्रु. अ. पु.

विपंची विविधंपञ्च्यतेस्वरोत्रेति विपंची, नानाप्रकारचे स्वर उत्पन्न होताहेत जीचेठायीं ती. कृ. डुपचषधा. पाकअ. वीणा. ई. स्त्री.

विपणः विपणनंविपणः, विक्रयजो तो. कृ. पणधा. व्यवहार

अ. विकर्णे. अ. पु.

वपणिः विपणी विपण्यंतेस्यां विपणिः, व्यवहार करिजेतो जी चेठायीं ती. इत्यादि पूर्वीच्या श. प्र. बाजार. २ विकावयाची वस्तु. इ. २ ई. स्त्री.

वेपत्तिः विपदनंविपत्तिः, आपत्तीजी ती. कृ. पद्धा. गतिअ. आपत्ती. इ. स्त्री.

विपथः विरुद्धः पंथाविपथः, विरुद्धजो मार्ग तो. स. वाईट मार्ग. अ. पु.

विपद् विग्रहादिविपत्तिश. प्रमाणें. दू. स्त्री.

विपर्ययः विपर्ययणंविपर्ययः, विपर्यासजो तो. कृ. इण्धा. गतिअ. व्यतिक्रम. अ. पु.

विपर्यायः विग्रहादिसर्वपूर्वीच्याशब्दाप्रमाणें.

विपर्यासः विपर्यसनंविपर्यासः व्यतिक्रमजो तो. कृ. असुधा. क्षेपअ. अर्थपूर्वीच्या श. प्र.

विपश्चित् विप्रकृष्टंचिंतयतीति विपश्चित्, विप्रकृष्टातें चिंतन करणाराजो तो. कृ. चितीधा. स्मृतिअ. पंडित. तृ. पु.

विपादिका विपद्यतेनयाविपादिका, विपत्ति होत्ये जेणें करून ती. कृ. पदधा. गतिअ. पायांच्या घोटाफुटण्याचा रोगविशेष. आ. स्त्री.

विपाशा विगताः पाशाः यत्रविपाशा, गेले आहेत पाश ह्म. भवपाश जीच्याठायीं ती. स. नदीविशेष. आ. स्त्री.

विपाट् विग्रहादिपूर्वीच्याश. प्र. विपाशानदी. त्. स्त्री.

विपिनं वेपंतेतर्वादयोत्रविपिनं, कंपित होतात तर्वादिक जाचेठायीं तें. कृ. टुवेपृधा. कंपनअ. अरण्य. अ. न.

विपुलं विपोलतीतिविपुलं, महत्त्व पावतें जें तें. कृ. पुलधा. महत्त्वअ. विस्तीर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिं.

विप्रः विप्रातीतिविप्रः, विशेषें करून पूरण करणारा जो तो. कृ. प्राधा. पूरणअ. ब्राह्मण. अ. पु.

विप्रकारः विप्रकरणंविप्रकारः, अपकार जो तो. कृ. डुकृञ्धा. करणअ. अपकार. अ. पु.

विप्रकृत: विप्राकारिविप्रकृतः, विवर्ण करिजेतो जो तो. कृ. कृ धा. करणअ. हलका केलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विप्रकृष्टकं विगतंप्रकृष्टंयस्मा दितिविप्रकृष्टकं, गेलें आहेसा मीप्यजापासून तें. स. दूरव्यव हित. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विप्रतीसार: विरुद्धंप्रतिसर तीतिविप्रतीसारः, विरुद्धाप्रत नष्टकरितो जो तो. कृ. सृधा. ग तिअ. पश्चात्ताप. अ. पु.

विप्रयोग: विप्रयोजनंविप्रयो गः, वियोजन जें तो. कृ. युजि र्धा. योगअ. प्रीतियुक्तांचावि योग. अ. पु.

विप्रलब्ध: विप्रलभ्यतेस्मावि प्रलब्धः, विप्रलब्ध करिजेला जो तो. कृ. डुलभष्धा. प्राप्तिअ. वंचना पावलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विप्रलंभ: विप्रलब्धिर्विप्रलंभः विच्छेद जो तो. कृ. डुलभष्धा. प्राप्तिअ. वंचनायुक्तभाषण. अ. पु.

विप्रलाप: विरुद्धःप्रलापोविप्रला पः, विरुद्ध जें भाषण तें. स. विरु द्धभाषण. अ. पु.

विप्रश्निका विविधःप्रश्नोस्यस्यां इतिविप्रश्निका, अनेक प्रकार चा आहे प्रश्न जीस ती. त. शु भाशुभ जाणणारी स्त्री. आ. स्त्री.

विप्रुट् विगतःप्रोषोदाहोयस्याः विप्रुट्, गेला आहे दाह जीपा सून ती. स. पाण्याचा बिंदु. ष. स्त्री.

विप्लव: विप्लवनंविप्लवः, उपस र्गविशेष जो तो. कृ. प्लुङ्धा. ग तिअ. उपद्रवविशेष. २ प्रलय. अ. पु.

विबंध: विबध्यतेनेनेतिविबं धः, बंधन होतें जेणें करून तो. कृ. वृत्ति. बंधधा. बंधन अर्थ. मलमूत्र निरोध. अकारांत. पुल्लिं.

विबुध: विशेषेणबुध्यतइति विबुधः, विशेषें करून बुद्धियु क्त असतो जो तो. कृ. वृत्ति. बु धिरधा. बोधन अर्थ. ज्ञानी, पंडित. अ. पु.

विभवः विभवतीतिविभवः, समर्थअसतोजो तो. क्र. भूधा. सत्ताअ. द्रव्य. अ. पु.

विभाकरः विभाकांतिस्तांकरोतीतिविभाकरः, कांतीतें करितोजो तो. क्र. कृञ्धा. करणअ. सूर्य. अ. पु.

विभावरी विभातिनक्षत्रादिभिरितिविभावरी, नक्षत्रादिकांनीं शोभत्येजी ती. क्र. भाधा. दीप्तिअ. रात्रि. ई. स्त्री.

विभावसुः विशिष्टाभावसुर्धनंयस्यसविभावसुः, विशिष्ट म्ह. तेज आहे द्रव्य जाचें तो. स. अग्नि. २ सूर्य. उ. पु.

विभीतकः विगतंभीतंरोगभयंयस्मादितिविभीतकः गेलें आहे भीत म्ह. रोगभय जा पासून तो. स. बेहड्याचें झाड. अ. पु.

विभीतकी विशिष्टंभयमस्याइतिविभीतकी, उत्कृष्ट आहे भय म्ह. भूत निवासत्वें करून भय जीपासून ती. स. बेहड्याचें झाड. ई. स्त्री.

विभूतिः भवनंभूतिः विशिष्टाभूतिर्विभूतिः, विशिष्ट जी भूति म्ह. ऐश्वर्य ती. स. ऐश्वर्य. इ. स्त्रीलिं.

विभूषणं विभूष्यतेनेनविभूषणं, भूषित होतो जेणें तें. क्र. भूषधा. अलंकारअ. अलंकार. अ. न.

विभ्रमः विशेषेणभ्रम्यतेइतिविभ्रमः, विशेषें करून जो भ्रम म्ह. अनवस्थान तो. क्र. भ्रमुधा. अनवस्थानअ. स्त्रियांचा एक भाव आहे. २ शोभा. ३ भ्रांति. अ. पु.

विभ्राट् विभ्राजतेइतिविभ्राट्, अत्यंत ——— शोभणारा जो तो. क्र. भ्राजृधा. दीप्तिअ. अतिशयें करून शोभणारा. ज्. पु. न. स्त्रीलिं.

विमनाः विगतंमनोयस्यविमनाः, गेलें आहे मनःस्थैर्य ज्याचें तो. स. विरस जाहलेला. वि. स्. पु. स्त्री. न.

विमयः विग्रहादिनियमशब्दाप्रमाणें मोबदला. अ. पु.

विमर्दनं विमर्दोविमर्दनं, कुंकु

मर्दितक्षोद जो तें. कृ. मृदधा. क्षो
दअ. मर्दन. अ. न.

विमला विगतोमलो यस्यासाविम
ला, नष्ट केला आहे मल जीणें ती.
स. शिक्केकाई. आ. स्त्री.

विमातृजः विमातुः जातोविमा
तृजः, सावत्रमातेपासून झाला
जो तो. कृ. जनीधा. प्रादुर्भावअ.
सावत्रबंधु. अ. पु.

विमानं विशिष्टंमानयंत्यनेनेति
विमानं, पुरुषातें मानिताहेत
जेणें करून तें. कृ. मानधा. पूजा
अ. आकाशमार्गे जावयाचा देवां
चा यानविशेष. अ. न.

वियत् विविश्वतएतिव्याप्नोतीति
वियत्, विश्वातें —— व्याप्त करि
तें जें तें. कृ. इण्धा. गतिअ. आ
काश. त्. न.

वियद्गंगा वियतःगंगावियद्गंगा,
आकाशसंबंधी जी गंगा ती. स.
स्वर्गंगा, भागीरथी. आ. स्त्री.

वियमः विग्रहादिवियामशब्दा
प्रमाणें. योग साधनास अंगभू
त जो समय तो. अ. पु.

वियातः विरुद्धंयानमस्यासौविया
तः, विरुद्ध आहे चेष्टित ज्याचें
तो. स. दांडगा. वि. अ. पु. न. आ.
स्त्रीलिं.

वियामः वियमनंवियामः, संय
म जो तो. कृ. यमधा. उपरमअ.
योगसाधनास अंगभूत जो स
मय तो. अ. पु.

विरजस्तमाः विगतेरजस्तम
सीयस्मात्सविरजस्तमाः, गेले
आहेत रजस्तमोगुण ज्यापासून तो.
स. सत्वगुणी. वि. स्. पु. न. स्त्री.

विरतिः विरमणंविरतिः, उपरम
ण जें ती. कृ. रमुधा. क्रीडाअ. उ
परति. इ. स्त्री.

विराट् विशेषेणराजतेइतिविरा
ट्, विशेषें करून देदीप्यमान हो
णारा जो तो. कृ. राजृधा. दीप्त्य
र्थे. क्षत्रिय. ज्. पु.

विरावः विशेषेणरूयतइतिवि
रावः, विशेषें करून शब्द करितो जो
तो.कृ. रुधा. शब्दअ. शब्द. अ. पु.

विरिंचः विरिंचिः विरच
यतीतिविरिंचिः, विश्वातें रचित
करितो जो तो. कृ. रचधा. प्रति
यत्नअ. ब्रह्मदेव. अ. पु.

विरूपाक्षः विविधरूपाण्यक्षीणियस्यसः विरूपाक्षः, अनेकविधक्षअनेकप्रकारचीं आहेत नेत्रें जाचीं तो. स. महादेव. अ. पु.

विरोचनः विरोचतेइतिविरोचनःप्रकाशित होतो जो तो. कृ. रुचधा. दीप्तिअ. सूर्य. २ चंद्र. ३ अग्नि. प्रल्हादाचा पुत्र. अ. पु.

विरोधः विरुध्यतेइतिविरोधः, वैरजें तो. कृ. रुधिरधा. आवरणअ. वैर. अ. पु.

विरोधनं विरोधोविरोधनं, विरोधजो तें. कृ. रुधिरूधा. आवरणअ. विरोध. अ. न.

विरोधोक्तिः विरोधस्योक्तिर्विरोधोक्तिः, विरोधसंबंधीजी उक्तिती. स. विरुद्धभाषण. इ. स्त्री.

विलक्षः विशेषेणलक्षयतीतिविलक्षः, विशेषेंकरून दिसतो जो तो. कृ. लक्षधा. आलोचनअ. शक्लवर्ण. २आश्चर्ययुक्त. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विलक्षणं विगतंलक्षणमस्मिन्नतद्विलक्षणं, गेलें आहे आलोचन क्ष. कारणस्थिती जाचेठायीं तें. स. कारणरहितस्थिति. अ. न. २भिन्न. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विलंबितं विलंबतेकरचरणाद्यत्रेतिविलंबितं, करचरणाद्यवयव विलंबित होतो जाचेठायीं तें. कृ. लबिधा. अवस्रंसनअ. सावकाश. अ. न.

विलंभः विलब्धिर्विलंभः, विसर्जन जें तो. कृ. डुलभष्धा. प्राप्तिअ. फारदेणें. अ. पु.

विलापः विलपनइतिविलापः, रोदनपूर्वक भाषण जें तो. कृ. लपधा. व्यक्तभकअ. रोदनपूर्वक भाषण. अ. पु.

विलासः विलसनंविलासः, नेत्राजी तो. कृ. लसधा. क्रीडनअ. स्त्रियांच्याचेष्टा. अ. पु.

विलीनः विलीयतेस्मविलीनः, लीन करिजेला जो तो. कृ. लीङ्धा. श्लेषणअ. पातळ झालेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विलेपनं विलिप्यतेनेनविलेपनं, विलेपन करिजेतें जेणें करून तें. कृ. लिपधा. उपदे

हअ. शरीरास उटी करण्यास यो ग्य सुवासिक द्रव्यविशेष ज्यास उ टणें असें ह्मणतात तें. २ केशरादि कांची उटी. अ. न.

विलेपी विलिंपतीति विलेपी, वईन णावलेजी ती. कृ. लिपधा. उपदेहअ कुण्हेरी. ई. स्त्री.

विवधः विविधं हन्यते नेनेति विवधः, विविध गमन करिजे तें जेणें करू न तो. कृ. हनधा. हिंसादिअ. ध्या नादिपर्याहार. २ मार्ग. अ. पु.

विवधिकः विविधं वीवधं वा वह तीति विवधिकः, नानाप्रकारक वार्ता व मार्ग यातें वाह तो जो तो. कृ. वार्तावाहक कावड्या. अ. पु.

विवरं व्रियते इति विवरं, स्वीकृत करिजेलें जें तें. कृ. वृञ्धा. वरण अ. छिद्र. अ. न.

विवर्णः विगतो वर्णो यस्य विवर्णः गेलें आहे रूप ज्याचें तो. स. नी च, पामर. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विवशः विरुद्धं वष्टीति विवशः, विरुद्ध इच्छा करिती जो तो. कृ. व शधा. कांतिअ. मरणाजवळ आ ल्यामुळें जो बुद्धि विव्हळ झाला तो. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विवस्वान् विवस्तेजोस्यास्तीति विवस्वान्, तेज आहे ज्यास तो. त. सूर्य. २ देव. न्. पु.

विवादः विरुद्धो वादो विवादः, वि रुद्ध जो वाद तो. स. देण्याघेण्या बद्दल वगैरे वाद. अ. पु.

विवाहः विशिष्टं वहनं विवाहः, वि शिष्ट जें प्रापण तो. कृ. वहधा. प्राप णअ. लग्न. अ. पु.

विविक्तः विविनक्ति जनो त्रवि विक्तः, जन ज्याचेठायीं पृथक्भा वें करून राहात नाहीं असा जो तो. कृ. विचिर्धा. पृथग्भावअ. एकांत. २ पवित्र. ३ विचारशील. ४ वेगळा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विविधः विचित्रा विधास्य विवि धः, विचित्र आहे प्रकार ज्याचा तो. स. नानाप्रकारचा. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विवेकः विवेचनं विवेकः, विवे चन ह्म. विचार जो तो. कृ. विचि र्धा. पृथग्भावअ. विचार. २ पृ थक्पणा. अ. पु.

विब्बोकः विशेषेण गर्वतीति वि

ण्वोकः, विशेषेंकरून गर्वितअसतो जो तो. कृ. गर्वधा. दर्पअ. स्त्रियांचा एक हावभावगर्वानें पतीचा अनादरकरणें. अ. पु.

विट् विशत्युदरादाविति विट्, उदरादिकाचेठायीं प्रविष्ट असतेजो ती. कृ. विशधा. प्रवेशनअ. विष्ठा. २ मनुष्य. ३ वैश्य. श. स्त्री.

विशंकट विस्तृतंशंकटंविशंकटं, विस्तृतजेंशंकटोंविस्तीर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विंशतिः विंशानांपूरणीविंशतिः, विंशतिसंख्येचीजी पूरण कर्त्री ती. त. विंशति संख्या. २ वीस मनुष्यादि. इ. स्त्री.

विशदः विशीयतइतिविशदः, ती क्ष्ण किंवा स्वच्छ केलेला जो तो. कृ. षद्लृधा. शातनअ. स्वच्छ. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विशरः विशरणंविशरः, हिंसन जो तो. कृ. शृधा. हिंसाअ. ठारमारणें. अ. पु.

विशल्या विगतंशल्यमनयाविशल्या, विगतआहेरुक्ष्म. शल्यजीणेंकरून ती. स. गुळवेल. २ कळलावी. ३ दांती. ४ त्रिपुटाख्यामकवनौषधी. आ. स्त्री.

विशसनं विशस्यतेविशसनं, वधजो तें. कृ. शसुधा. हिंसाअ. ठारमारणें. अ. न.

विशाखः विशाखायांजातःविशाखः, विशाखांचेठायीं जो झाला जो. त. कार्तिकस्वामी. अ. पु.

विशाखा विशाखतीतिविशाखा, व्याप्त करितें जी ती. कृ. शाखृधा. व्याप्तिअ. विशाखा नक्षत्र. आ. स्त्री.

विशायः विशयनंविशायः, पर्यायें करून जें शयन तें. कृ. शीङ्धा. स्वप्नअ. पाहरेकरी. अ. पु.

विशारणं विशीर्यतेविशारणं, हिंसन जें तें. कृ. शृधा. हिंसाअ. वध. अ. न.

विशारदः विशिष्टाशारदायस्य विशारदः, विशिष्ट आहे शारदा ह्म. सरस्वती जास तो. स. पंडित. २ दांडगा. अ. पु.

विशालं विग्रहादिविशंकटशद्वाप्रमाणें. विस्तीर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विशालता विशालस्यभावी

विशालता, विशाल स. विस्तीर्ण त्याचा जो भाव ती. त. विस्तार. आ. स्त्री.

विशालत्वक् विशालात्वगस्यावि शालत्वक्, दीर्घ आहे त्वचा जाची तो. स. सातवणाचें झाड. न. पु.

विशाला विशलतीतिविशाला, विशेषें करून विस्तार करिते जी ती. कृ. शलधा. गतिअ. मोठी कवडळ. आ. स्त्री.

विशिख: विशिष्टाशिखाग्रमस्य विशिख:, उत्तम आहे अग्रजाचें तो. स. बाण. अ. पु.

विशिखा विशेतेस्यामितिविशिखा, गमन करितात जींचेठायीं ती. कृ. शीङ्धा. स्वप्नअ. गावांतील लहान मार्ग. आ. स्त्री.

विशेषकं विशिनष्टीतिविशेषकं, भूषित करणारें जें तें. कृ. शिष्लृधा. विशेषणअ. कस्तूरीचा वगैरे कपाळीं लावलेला टिळा. अ. पु. न.

विस्रंभ: विग्रहादिविस्रंभशब्दाप्रमाणें. विश्वास. २ शृंगाराविषयीं स्त्रियांची प्रार्थना. अ. पु.

विश्राणनं विश्राण्यतेविश्राणनं, देइजेतें जें तें. कृ. श्रणधा. दानअ. दान देणें. अ. न.

विश्राव: विश्रवणंविश्राव:, अतिप्रसिद्धी जी तो. कृ. श्रुधा. श्रवणअ. अत्यंत प्रसिद्धि. अ. पु.

विश्रुत: अश्रावीति विश्रुत:, श्रवण करिजेला जो तो. कृ. श्रुधा. श्रवणअ. प्रख्यात. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विश्वे विशंति कर्मस्वितिविश्वे, श्राद्धादि कर्मांचेठायीं प्रवेश करितात जे ते. कृ. विशधा. प्रवेशनअ. देवांचे गणविशेष. अ. पु. २ सर्व. ३ सुंठ. अ. न.

विश्वकद्रु: विश्वंकंदतेइतिविश्वकद्रु:, विश्वाप्रतआक्रंदन करितो जो तो. कृ. कदिधा. आह्वानाद्य. शिकारीचा कुत्रा. उ. पु.

विश्वकर्मा विश्वंकर्मास्मादस्य वा विश्वकर्मा, विश्व आहे कर्म जापासून किंवा विश्व आहे कर्म जाचें तो. स. देवांचा शिल्पिविशेष, देवांचा सुतार. न. पु.

विश्वग्यङ्. विश्वग्रहादिसर्व विष्वग्यङ्शब्दाप्रमाणें. सर्वत्र गमनकरणारा. वि. त्र. पु. न. ई. स्त्री.

विश्वभेषजं विश्वस्यभेषजंविश्वभेषजं, विश्वाचें जें औषधतें. स. संठ. अ. न.

विश्वंभरः विश्वंबिभर्त्तीतिविश्वंभरः, विश्वाचें पोषण करितो जो तो. कृ. डुभृञ्धा. पोषणअ. विष्णु. अ. पु.

विश्वंभरा विश्वंबिभर्त्तीतिविश्वंभरा, जगातें धारण करित्येजी ती. कृ. डुभृञ्धा. धारणअ. पृथ्वी. आ. स्त्री.

विश्वसृट् विश्वंसृजतीतिविश्वसृट्, विश्वातें उत्पन्न करितोजो तो. कृ. सृजधा. विसर्गअ. ब्रह्मदेव. ज्. पु.

विश्वस्ता विफलंश्वसितीतिविश्वस्ता, विफल आहे जीवन जीचें ती. कृ. श्वसधा. प्राणनअ. विधवा, रंडा. आ. स्त्री.

विश्वा विशतीतिविश्वा, व्याप्ति करित्येजी ती. कृ. विशधा. प्रवेशअ. अतिविषा. आ. स्त्री.

विश्वासः विश्वसनंविश्वासः, विश्वसनजें तो. कृ. श्वसधा. प्राणनअ. भरवसा. अ. पु.

विषं वेवेष्टिविषं, व्यापकरितें जें तें. कृ. विष्लृधा. व्याप्तिअ. सोमलादि. अ. पु. न. २ उदक. अ. न.

विषधरः विषस्यधरोविषधरः, विषाचा धारण कर्त्ता जो तो. स. सर्प. अ. पु.

विषमच्छदः विषमाः छदाःयस्यविषमच्छदः, विषम म्ह. सम आहेत छदें म्ह. पत्रें जास तो. स. सातवणाचें झाड. अ. पु.

विषयः विषयनंविषयः, आश्रयण जें तो. कृ. षिञ्धा. बंधनअ. देश. २ इंद्रियग्राह्य. ३ रूपरस गंधस्पर्श हे पांच विषय. ४ आश्रय. ५ ज्याचा जो नित्य सेवन करावयाचा तो त्याचा विषय. अ. पु.

विषयि विषयोस्यास्तीतिविषयी, विषय आहे प्रियजास तें. त. इंद्रिय. न्. न.

विषवैद्यः विषस्यवैद्योविषवै

द्यः, विषाचा जो वैद्य ती. स. विषहारक वैद्य. अ. पु.

विषा वेवेष्टीतिविषा, सर्वांस व्याप्त करिते जी ती. कृ. विष्लृ धा. व्याप्तिअ. अतिविषा. आ. स्त्रीलिं.

विषाणं व्यस्तीतिविषाणं, वि विधाकानें शहतेंजें तें. कृ. असधा. भुविअ. पशूचें शिंग. २ हस्तिदंत. अ. पु. न.

विषाणी विषाणमस्यस्याविषाणी, शृंगसदृश आहे पत्रें जीचीं ती. त. मेढशिंगी. २ पशूचें शिंग. ३ हस्तिदंत. ई. स्त्री.

विषुवं अहोरात्रयोर्विषुसाम्यं यत्रास्तितद्विषुवं, रात्रीचें व दिवसाचें आहे साम्य ज्याचेठायीं तें. त. तुला आणि मेष त्या संक्रांतीच्या कालीं दिवस व रात्रीचें मान समान होतें तो काल. अ. पु. न.

विषुवत् विग्रहादिसर्वपूर्वीच्या शब्दाप्रमाणें. त्. न.

विष्किरः विग्रहादिविकिरशब्दाप्रमाणें. पक्षी. अ. पु.

विष्टपं विशंत्यत्रेतिविष्टपं, प्रवेश करितात ज्याचेठायीं तें. कृ. विश धा. प्रवेशनअ. भूतल. अ. पु. न.

विष्टरः विस्तीर्यतेइतिविष्टरः, विस्तीर्ण करिजेतो जो तो. कृ. स्तृञ्धा. आच्छादनअ. आसन. २ वृक्ष. ३ दर्भमुष्टि. अ. पु.

विष्टरश्रवाः विष्टरोदर्भमुष्टिस्तद्वच्छ्रवसीयस्यविष्टरश्रवाः, दर्भमुष्टी सारखे आहेत कर्ण ज्याचे तो. स. विष्णु. स्. पु.

विष्टिः वेषणंविष्टिः, बलात्कारानें राकणें जें ती. कृ. विषधा. विप्रयोगअ. नरकामध्यें बलात्कारानें राकणें. इ. स्त्री.

विष्ठा कुत्सितंवितिष्ठतेउदरे इतिविष्ठा, उदराम्न. जठर त्याचेठायीं कुत्सितराहाते जी ती. कृ. ष्ठाधा. गतिनिवृत्तिअ. पोटांतील मळ. आ. स्त्री.

विष्णुः वेवेष्टिव्याप्नोतिसर्वमितिविष्णुः, सर्वांतें व्याप्त करितो जो तो. कृ. विष्लृधा. व्याप्तिअ. नारायण. उ. पु.

विष्णुक्रांता विष्णुनाक्रांताऽवि

ष्णुक्रांता, विष्णूनें आक्रमण करिजेली जी ती. स. वनौषधि विशेष. आ. स्त्री.

विष्णुपदं विष्णोः पदं विष्णुपदं, विष्णूचें जें आस्पद किंवा स्वरूप तें. स. आकाश. अ. पु. न.

विष्णुपदी विष्णुपदोत्स्या विष्णुपदी, विष्णुपदापासून उत्पन्न झाली जी ती. त. भागीरथी नदी. ई स्त्रीलिं.

विष्णुरथः विष्णोरथः विष्णुरथः, विष्णूचा जो रथ तो. स. गरुडपक्षी. अ. पु.

विष्यः विषेणवध्यो विष्यः, विषानें जो वधार्ह तो. त. विषघालून मारण्यास योग्य. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विष्वक् विषुसर्वतः अंचतीति विष्वक्, आसमंतात् या अर्थी विषयीं जें पूजित स्म. आदृत तें. कृ. अंचुधा. पूजादिअ. समंततः या अर्थीं अव्य.

विष्वक्सेनः विषुनाना अंचतीति विषूची विषूची सेना यस्य स विष्वक्सेनः, अनेकस्थलीं गमन करणारी आहे सेना ज्याची तो. स. विष्णु. अ. पु.

विष्वक्सेनप्रिया विष्वक्सेनस्य प्रिया विष्वक्सेनप्रिया, विष्णूला जी प्रिय ती. स. वाराहकंद आ. स्त्री.

विष्वक्सेना विष्वक्सिनोतीति विष्वक्सेना, सर्वत्र फलें करून बंधन पावत्ये जी ती. कृ. षिञ् धा. बंधनअ. वाघांटि. आ. स्त्री.

विष्वद्र्यङ्. विष्वगंचतीति विष्वद्र्यङ्, सर्वत्र गमन करितो जो तो. कृ. अंचुधा. गतिअ. आसमंतात् भागीं गमन करणारा. वि. च्. पु. न. ई. स्त्री.

विसंवादः विसंवक्ति विसंवादः, वंचनायुक्त भाषण जें तो. कृ. वदधा. व्यक्तवाणीअ. वंचनायुक्त जें भाषण तें. अ. पु.

विसरः विसरतीति विसरः, विशेषें करून गमन करणारा जो तो. कृ. सृधा. गतिअ. समूह. अ. पु.

विसर्जनं विसृज्यते इति विसर्जनं, देइजेतें जें तें. कृ. सृषू

धा. विसर्गअ. दानदेणें. अ. न.

विसर्पणं विसर्पोविसर्पणं, व्रणादि प्रसरण जें तें. कृ. सृप्लृधा. गतिअ. व्रणादिकांचें प्रसरण. अ. न.

विसारः विसरतीतिविसारः, गमन करितो जो तो. कृ. सृधा. गतिअ. मत्स्य. अ. पु.

विसारी विसरणंविसारः, सो स्यास्तीतिविसारी, प्रसार आहे ज्याचा तो. त. सरऽ. वि. इन्. पु. न. ई. स्त्री.

विसृतं विसरतिस्मविसृतं, विस्तीर्ण झालें जें तें. कृ. सृधा. गतिअ. पसरलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विसृत्वरः विसरणशीलोविसृत्वरः, प्रसरणस्वभावजो तो. कृ. सृधा. गतिअ. प्रसरणशील. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विस्तरः विस्तरणंविस्तरः, विस्तृती जी ती. कृ. स्तृञ्धा. आच्छादनअ. शब्दविस्तार. अ. पु.

विस्तारः विस्तरणंविस्तारः विस्तृती जी ती. कृ. धा. पू. श. प्र. विस्तार. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विस्तृतं विस्तीर्यतेस्मविस्तृतं, विस्तृत झालें जें तें. कृ. स्तृञ्धा. आच्छादनअ. विस्तीर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विस्फारः विस्फुरणंविस्फारः, धनुष्याचा जो शब्द तो. कृ. स्फुरधा. स्फुरणअ. धनुष्याचे दोरीचा ठणत्कार. अ. पु.

विस्फोटः विस्फोटतीतिविस्फोटः, अंगातें विशीर्ण करितो जो तो. कृ. स्फुटिर्धा. विशरणाअ. फोड. अ. पुल्लिं.

विस्मयः विस्मापयतीतिविस्मयः, आश्चर्ययुक्त करितो जो तो. कृ. ष्मिङ्धा. ईषद्धसनअ. आश्चर्य, अद्भुत नामा रस. अ. पु.

विस्मयान्वितः विस्मयेनान्वितोविस्मयान्वितः, आश्चर्यें करून जो युक्त तो. स. आश्चर्ययुक्त. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विस्मृतं विस्मर्यतेस्मविस्मृतं, विस्मरण करिजेलें जें तें. कृ.

स्मृधा. आध्यानअ. विसरले
ला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

विस्रं विस्रंसतेइतिविस्रं, वि
स्रंसित ह्ल. त्यक्त होतें जें तें.
कृ. स्रंसुधा. अवस्रंसनअ.
ज्यास अपक्व मांसाच्या गंधा
सारखा गंध आहे तो. वि. अ.
पु. न. आ. स्त्री.

विस्रंभः विस्रंभणंविस्रंभः,
विश्वसन जें तो. कृ. स्रंभुधा. वि
श्वासअ. विश्वास. २ शृंगारप्रा
र्थना. अ. पु.

विस्रसा विस्रस्यतेअनयावि
स्रसा, गात्रादिक शिथिल होता
हेत जीर्ण करून ती. कृ. स्रंसु
धा. अवस्रंसनअ. म्हातारप
णा. आ. स्त्री.

विस्रावः विस्राव्यतइतिविस्रा
वः, ओदनापासून काढिजे तो जो
तो. कृ. स्रुधा. गतिअ. भाताची
पेज. अ. पु.

विहगः विग्रहादिविहंगम शब्दा
प्रमाणें. पक्षी. अ. पु.

विहंगः विहायसिगच्छतीतिवि
हंगः, अर्थादिक खग शब्दाप्रमा
णें. पक्षी. अ. पु.

विहंगमः विग्रहादिविहंगम श
ब्दाप्रमाणें. पक्षी. अ. पु.

विहंगमा विहायसिगच्छतीति
विहंगमा, आकाशाचेठायीं राह
ते जी ती. कृ. गम्लृधा. गतिअ.
भिंतीसलावलेली लांकडाची खुं
टी. आ. स्त्री.

विहंगिका विहंगइवप्रतिकृति
विहंगिका, पक्ष्याची जी प्रतिमा
ती. त. लांकडांची खुंटी. आ. स्त्री.

विहसितं विहस्यतेइतिविह
सितं, हास्यजें तें. कृ. हसधा.
हसनअ. मध्यमहास्य. अ. न.

विहस्तः विक्षिप्तोहस्तोस्यवि
हस्तः, विक्षिप्त आहे हस्त जा
चा तो. स. व्याकुळ. वि. अ. पु.
न. आ. स्त्री.

विहापितं विहापनंविहापि
तं, दान जें तें. कृ. ओहाकृधा.
त्यागअ. दानदेणें. अ. न.

विहायाः विजहातिभुवंविहा
याः, पृथ्वीप्रत टाकणारा जो तो.
कृ. ओहाकृधा. त्यागअ. आकाश.
स. पु. न. २ पक्षी. स. पु.

विहायस: विग्रहादिपूर्वीच्या शब्दाप्रमाणें. अ. पु.

विहार: विहरणंविहारः, क्रीडोर्थ संचरणजें तो. कृ. हृञ् धा. हरणअ. पायांनीं जाणें. अ. पु.

विह्वल: विह्वलतेइतिविह्वलः, विह्वल होतो जो ती. कृ. ह्वलधा संचलनअ. शोकादिकें करून गात्र भंगपावलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वीकाश: विकाशनंवीकाशः, प्रकाशजो तो. कृ. काशृधा. दीप्तिअ. एकांत. २प्रकाश. वि. अ पु. न. आ. स्त्री.

वीचि: वेतिवृद्धिंगच्छतीतिवीचिः वृद्धीप्रत पावत्ये जी ती. कृ. वी धा. वृध्यादिलाट. इ. स्त्री.

वीणा वेतिप्रजायतेस्वरोस्यामितिवीणा, स्वर उत्पन्न होतो जीचाठायीं ती. कृ. वीधा. प्रजननअ. वाद्यविशेष. आ. स्त्री.

वीणादंड: वीणायादंडोवीणादंडः, वीणेचाजो दंड तो. स. विणेचा दांडा. अ. पु.

वीणावाद: वीणांवादयतीति वीणावादः, वीणेतें वादन करितोजो तो. कृ. वदधा. व्यक्तवाणी अ. विणा वाजविणारा. अ. पु.

वीतंस: वीतंस्यतेइतिवीतंसः, प्रक्षिप्त करिजेतोजो तो. कृ. तसूधा. उपक्षेपअ. मृगपक्षीइत्यादिकांस बंदीत ठेवण्याचें साधन फांसजाळें इत्यादि. अ. पु.

वीत वेतियुद्धकर्मण इति वीतं, युद्धादिकर्मापासून दूर होणारें जें गजादि तें. कृ. वीधा. गतिअ. युद्धादिकाचेठायीं अनुपयुक्तजो हत्ती घोडा. इत्यादि. अ. न.

वीति: वेतीतिवीतिः, गमन करणाराजो तो. कृ. वीधा. गतिअ. घोडा. इ. पु.

वीतिहोत्र: वीतिः पुरोडाशादिभक्ष्यं होत्रंहवनंयस्यसवीतिहोत्रः, पुरोडाशादिभक्ष्य आहे हवन ज्याचें तो. स. अग्नि. अ. पु.

वीथि: विग्रहादिपुढच्याशब्दाप्रमाणें. पंक्ति. इ. स्त्री.

वीथी वीथ्यते नयावीथी, यात्रा करिजेतो जीणें करून ती. कृ.

विथृधा. याचनअ. पंक्ति. २मा
र्ग. ई. स्त्री.

वीध्रं वींध्रे इतिवीध्रं, प्रकाशि
त होतें जें तें. कृ. ञिइंधीधा. दी
प्तिअ. स्वभावतः जें निर्मळ तें.
वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वीनाहः विनह्यतेनेनवीनाहः
कूपमुख बंधन करिजेतें जेणें
करून तो. कृ. णहधा. बंधनअ.
दगडानें बांधलेलें विहिरीचें तों
ड. अ. पु.

वीरः वीरयतीतिवीरः, विक्रांति
ह्य. पराक्रम करितो जो तो. कृ.
वीरधा. विक्रांतिअ. शूर. २ना
टकांतील एकरस. अ. पु.

वीरणं विपक्षिणमीरयतीतिवी
रणं, पक्षाप्रत प्रेरणा करितें जें
तें. कृ. ईरधा. गतिअ. काळावा
ळा. अ. न.

वीरतरं अतिशयितंवीरंवीरत
रं, अर्थादिसर्वपूर्वीच्याशब्दाप्र
माणें.

वीरतरुः वीरश्चासौतरुश्चवी
रतरुः, वीर असा जो तरु तो.
स. अर्जुनवृक्ष. उ. पु.

वीरपत्नी वीरः पतिर्यस्याः सा
वीरपत्नी, वीर आहे पती जीचा
ती. स. वीराची भार्या. ई. स्त्री.

वीरपानं. वीरपाणं वीराणां
पानंवीरपानं, वीरांचें जें पान
तें. स. युद्ध झालें किंवा होणें
असतां श्रम शांत्यर्थ किंवा उत्सा
हार्थ जें शूरलोक मद्यपान करि
तात तें. अ. न.

वीरभार्या वीरस्यभार्यावीरभार्या,
वीरपुरुषाची जी स्त्री ती. स. वी
राची स्त्री. आ. स्त्री.

वीरमाता वीरस्यमातावीरमा
ता, वीरपुरुषाची जी आई ती.
स. वीराची आई. ऋ. स्त्री.

वीरवृक्षः वीरइववृक्षः वीरवृक्षः,
शूरासारखा रोग नाश करणारा
जो वृक्ष तो. स. भिलाव्याचें झाड.
अ. पु.

वीराशंसनं वीराः आशंसंतेऽ
त्रवीराशंसनं, वीर जाच्याठायींयु
द्धेच्छा करितात तें. कृ. आङ्‌:
शासृधा. इच्छाअ. अत्यंत भय
प्रद जी युद्ध भूमि तें. अ. न.

वीरसूः वीरंसूतेइतिवीरसूः,

वीरपुरुषातें प्रसवणारी जी ती. कृ. षूङ्.धा. गर्भविमोचना दिअ. वीराची आई. ऊ. स्त्री.

वीरहा वीरमग्निंहंतीतिवीरहा, अग्नीचा नाश करणारा जो तो. कृ. हनधा. हिंसाद्यर्थ. ज्याचा गृहाग्नि नष्ट जाहला तो. न्.पु.

वीरः विरुद्धान्राति हंतीतिवीरः, शत्रूंतें मारितो जो तो. कृ. राधा. दानअ. शूर. अ.पु.

वीरुध् विरुणद्धीतिवीरुध्, विस्तारद्वारा आवरण करित्ये जी ती. कृ. रुधिर्.धा. आवरणअ. विस्तृत जी वल्ली ती. ध्. स्त्री.

वीर्यं वीरे अर्हाबेसाधुवीर्यं, शूरपुरुषाचे ठायीं जें साधु तें. त. पराक्रम. २ रेत. ३ तेजोविशेष. ४ सामर्थ्य. अ.न.

वीवधः विग्रहादिविवधशब्दाप्रमाणें. धान्यादिकपर्याहार. २ मार्ग. अ.पु.

वृकः वर्कतइतिवृकः, पश्चादिक ग्रहण करितो जो तो. कृ. वृकधा. आदानअ. लांडगा. २ उंदीर. अ.पु.

वृकधूपः वृकइवधूपः वृकधूपः, लांडग्या सारखा दुःखकारक जो धूप तो. स. अनेक पदार्थकृत धूप. २ धूप. अ.पु.

वृक्णं वृश्च्यतेस्मवृक्णं, छेदन करिजेलें जें तें. कृ. ओव्रश्चूधा. छेदनअ. तोडलेला. वि. अ.पु.न. आ.स्त्री.

वृक्षः वृक्षतेइतिवृक्षः, विस्तारानें भूप्रदेशावरण करितो जो तो. कृ. वृक्षधा. आवरणअ. झाड. अ.पु.

वृक्षभेदी वृक्षंभेत्तुंशीलमस्यवृक्षभेदी, वृक्षभेदनस्वभाव जो तो. कृ. भिदिर्.धा. विदारणअ. वाकसतासणी. इन्.पु.

वृक्षरुहा वृक्षंरोहतीतिवृक्षरुहा, वृक्षाप्रत किंवा वृक्षाचे ठायीं प्रादुर्भूत होत्ये जी ती. कृ. रुहधा. प्रादुर्भावादिअ. वृक्षावर जाहलेली लता इ. बांधें. आ.स्त्री.

वृक्षवाटिका वृक्षाणांवाटिका वृक्षवाटिका, वृक्षाची जी वाटिका इ. बाग ती. स. अमात्य किंवा वेश्या त्यांचा घराकडचा बाग

बगीचा. आ. स्त्री.

वृक्षादनः वृक्षमत्तीतिवृक्षादनः, वृक्षाप्रत अदन म्ह. भेदन करि तो जो तो. कृ. अद्धा. भक्षणअ. वाकस. अ. पु.

वृक्षादनी वृक्षमत्तीतिवृक्षादनी, वृक्ष भक्षण करित्ये जी ती. कृ. अद्धा. भक्षणअ. वृक्षरुहा, बांधें. ई. स्त्री.

वृक्षाम्लं वृक्षस्य आम्लं वृक्षाम्लं वृक्षसंबंधीं जें आम्ल तें. स. आमसोल. अ. न.

वृजिनं शिष्टैर्वर्ज्यतेतद्वृजिनं, शिष्टानीं वर्जिजेतें जें तें. कृ. वृजीधा. वर्जनअ. पातक. अ. न. २ वांकडा. वि. अ. पु. न. आ. स्त्री ३ क्लेश. अ. पु.

वृत्तः वृत्यतेस्मवृत्तः, वरणकरिजेला जो तो. कृ. वृतुधा. वर्तनअ. वरलेला. २ अभीप्सित. इष्ट. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वृत्तिः वर्ततेअनयावृत्तिः, रक्षण तें जीणें करूनती. कृ. वृतुधा. वर्तनअ. वेष्टन. ई. स्त्री.

वृत्तं विग्रह्यादिवर्तुलशब्दाप्र. वाटोळा. २ वरलेला. ३ अतीत भूत. ४ दृढ,गाढ. वि. अ. पु. न. आ. स्त्री. ५ पद्य. ६ चरित्र. अ. नपुंस.

वृत्तांतः वृत्तोंतोस्य वृत्तांतः वृत्त आहे अंत जाचा तो. स. प्रकरण. २ प्रकार. ३ कार्त्स्न्य. ४ वास्तविक लोकवृत्त. अ. पु.

वृत्तिः वर्तनंवृत्तिः, वर्तन जें ती. कृ. वृतुधा. वर्तनअ. जीविका. २ मूळ सूत्राचें विवरण. इ. स्त्रीलिं.

वृत्रहा वृत्रंहतवानितिवृत्रहा, वृत्रासुरातें मारिता झाला जो तो. कृ. हनधा. हिंसाअ. इंद्र. न्. पु.

वृत्रः वृणोतीतिवृत्रः, आवरण करितो जो तो. कृ. वृञ्धा. वरणअ. अंधकार. २ शत्रु. ३ दैत्यविशेष. अ. पु.

वृथा व्रियतेतद्वृथा, व्यर्थार्थी तें वरण करितें म्ह. त्याचें वरण करितें म्ह. तद्बोधकजें तें. कृ. वृञ्धा. वरणअ. निरर्थक. २ विधिहीन त्या अर्थी अव्य.

वृन्दः वृन्दा वृन्दं वर्धतेस्म

इतिवृद्धः, वृद्धीप्रत पावताझा लाजो तो. कृ. वृधुधा. वृद्धिअ. झालारा. २ विद्वान्. ३ दगडफूल. अ. न.

वृद्धत्वं वृद्धस्यभावोवृद्धत्वं, अर्थस्थविर शब्दाप्रमाणें. वृद्धपणा. अ. न.

वृद्धदारकः वृद्धोदारकोऽस्मादितिवृद्धदारकः, वृद्ध आहे दारक क्ष. पुत्रसदृश काष्ठादिजापासून तो. स. वरधारा जीर्ण फंजी अ. पु.

वृद्धश्रवाः वृद्धेभ्यः श्रृणोतीति वृद्धश्रवाः, वृद्ध जे ब्रह्मादिक त्यांपासून श्रवण करितो जो तो. कृ. श्रुधा. श्रवणअ. इंद्र. स. पु.

वृद्धनाभिः वृद्धाउन्नतानाभिर्यस्यसवृद्धनाभिः, उन्नत आहे नाभी ज्याची तो. स. वातादिकेंकरून ज्याची नाभीउंच झाली तो. इ. पु.

वृद्धिः वर्धनंवृद्धिः, वर्धन जें ती. कृ. वृधुधा. वर्धनअ. वर्धन. २ आदर्णो. इ. स्त्री.

वृद्धिजीविका वृध्याजीविका वृद्धिजीविका, वृद्धीकरूनजीविका जी ती. स. व्याजानें जी उपजीविका करितात ती. आ. स्त्री.

वृद्धोक्षः वृद्धश्चासोउक्षाचवृद्धोक्षः, वृद्ध जो वृषभ तो. स. झातारा बैल. अ. पु.

वृध्याजीवः वृद्धिराजीवोजीविकास्यवृध्याजीवः, वृद्धी आहेजीविका ज्याची तो. स. व्याजानेंउपजीविका करणारा. अ. पु.

वृंतं वृणोतीतिवृंतं, प्रसवातें बंधन करिजेतें जें तें. कृ. वृञ्धा. वरणअ. देट डेंख. अ. न.

वृंदं वृणोतिइतिवृंदं, संधीभूत होतें जें तें. कृ. वृञ्धा. वरणादिअ. समूह. अ. न.

वृंदा वंद्यतेसावृंदा, नम्रहोइजे ते जी ती. कृ. वदिधा. अभिवादनअ. वृक्षावर झालेली लता, बांधें. आ. स्त्री.

वृंदारकाः प्रशस्तंवृंदंयेषांतेवृंदारकाः, उत्कृष्ट आहे समुदाय ज्यांचा ते. स. देव. अ. पु. २ मुख्य. ३ सुंदर. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वृंदिष्ठः अतिशयेनवृंदारकोवृंदिष्ठः, अत्यंत जो मुख्य तो. त. आतिशयितश्रेष्ठ. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वृश्चिकः वृश्चतीतिवृश्चिकः, छेदन करितो जो तो. कृ. ओव्रश्चू धा. छेदनअ. विंचू. २ कीट विशेषहलकसर. ३ भ्रमर. ४ वृक्ष विशेष. ५ धुलें. ६ वृश्चिकराशी. अ. पु.

वृषः अभिलषितंवर्षतिफलमिति वृषः, इच्छित फळातें देतोजोतो कृ. वृषुधा. सेचनअ. बैल. २ वृष भराक्र. ३ सुपंथ. ४ अडुळसा. अ. पु.

वृषणः वर्षंतीतिवृषणः, सेचन करणाराजो तो. कृ. वृषुधा. सेच नअ. अंडकोश. अ. पु.

वृषभः वर्षतीतिवृषभः, सेचन करणारा जो तो. कृ. वृषुधा. सेच नअ. बैल. २ बैलघाटि. अ. पु.

वृषदंशकः वृषान्मूषकान्दंशती तिवृषदंशकः, मूषकांप्रत दंश क रितोजो तो. कृ. दंशधा. दशनअ. मार्जर. अ. पु.

वृषध्वजः वृषोध्वजश्चिन्हंयस्य सवृषध्वजः, वृषह्म. बैलआहे चि न्हजाचें तो. स. महादेव. अ. पु.

वृषा वर्षतीतिवृषा, उदकवृष्टि क रितो जो तो. कृ. वृषुधा. सेचनअ. इंद्र. न. पु.

वृषलः वृषंलुनातिइतिवृषलः, ध र्मनाश करितो जो तो. कृ. लुञ्धा. छेदनअ. शूद्र. अ. पु.

वृषस्यंती वृषंनरंआत्मनः इच्छ तीतिवृषस्यंती, पुरुषातें इच्छा करणारीजी ती. सना. अत्यंत मैथुने च्छावतीस्त्री. ई. स्त्री.

वृषा वर्षतीतिवृषा, पर्णादिकातें टाकितेजी ती. कृ. वृषुधा. सेचन अ. उंदरकानी. आ. स्त्री.

वृषाकपायी वृषाकपेःस्त्रीवृषाक पायी, हराचीव विष्णूचीजी स्त्री ती. स्वाम. लक्ष्मी. २ पार्वती. ३ ह रणवेल. ४ शतावरी. ई. स्त्री.

वृषी वर्षतिस्वरवंवृषी, स्वरवातें वर्षणारी जी ती. कृ. वृषुधा. से चनअ. सन्यासी ब्रह्मचारी इत्या दिकजे व्रती त्याचें आसन. ई. स्त्रीलिं.

वृष्टि: वर्षणंवृष्टि:, वर्षण जें तें. कृ. वृषुधा. सेचनअ. वर्षण. पाऊस. इ. स्त्री.

वृष्णि: वर्षतीतिवृष्णि:, सेचन करितो जो तो. कृ. वृषुधा. सेचनअ. किरण. २ मेढरूं. इ. पु.

वेग: वेजनंवेग:, चलन जें तें. कृ. ओविजीधा. भयचलनअ. वेग. २ प्रवाह. ३ विष्ठादिकांचा गुदद्वारानें जो निर्गम तो. अ. पु.

वेगी अतिशयितोवेगोस्यस्यवेगी, अतिशयित आहे वेग ज्यास तो. त. त्वरित, वेगयुक्त. वि. इन्. पु. न. ई. स्त्री.

वेणि: **वेणी** वेण्यतेइतिवेणि: विणली अथवा ग्रहण केली जाते जी ती. कृ. वेणृधा. गत्यादिअ. सर्पाकार रचलेला केशवेश. २ नदीवि. इ. २ई. स्त्री.

वेणु: वेणतीतिवेणु:, ऊर्ध्वगमन करणारा जो तो. कृ. वेणृधा. गतिअ. वेळू. उ. पु.

वेणुकं विग्रहादिवेणुकशब्दाप्रमाणें. मारण्याचा दांडा. अ. न.

वेणुध्म: वेणुंधमतीतिवेणुध्म:, वेणूतें वादनें करितो जो तो. कृ. ध्माधा. शब्दअ. वेणुवादक, पांवेकरी. अ. पु.

वेतनं वीयतेनेनवेतनं, ज्याच्यायोगानें भक्षण होतें तें. कृ. वीधा. खादनादिअ. चाकरी बद्दल मुशाहिरा. अ. न.

वेतस: वयतेइतिवेतस:, तंतुसंतान पावतो जो तो. कृ. वेञ्धा. तंतुसंतानअ. वेताचें झाड. अ. पु.

वेतस्वान् वेतसा: संत्यत्रवेतस्वान्, वेत आहेत ज्याचेठायीं तो. त. पुष्कळ वेताचीं झाडें जेथें आहेत तो देश. वि. त. पु. न. ई. स्त्री.

वेताल: वेवायौताल: प्रतिष्ठास्यसवेताल:, वायूचेठायीं आहे स्थिती ज्याची तो. स. वेताळ. अ. पु.

वेत्रवती वेत्राणिवल्लयोत्रसंतीतिवेत्रवती, वेत्रादिक आहेत जीच्याठायीं ती. त. नदीविशेष. ई. स्त्री.

वेद: धर्माधर्मौवेदयतीतिवेद:, धर्माधर्मातें जाणवितो जो तो. कृ. विद्धा. ज्ञानअ. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वण वेद हे

४ प्रत्येक. अ. पु.

वेदना वेदनंवेदना, अनुभवजो ती. कृ. विद्धा. ज्ञानअ. अनुभव. आ. स्त्री.

वेदिः विद्यतेशोधनेनाक्रियतेइति वेदिः, शोधनें करून जी केलीजाते जी ती. कृ. विद्धा. ज्ञानअ. यज्ञार्थ केलेली डमरूचे आकारासारखी भूमि. इ. स्त्री.

वेदिका विदंत्यस्यांवेदी सैववेदिका, सर्व वृत्तांत जाणतात जीचे ठायीं ती वेदी तीच वेदिका. न. अंगणामध्यें केलेलें बोहलें. आ. स्त्री.

वेदी विदंत्यस्यांवेदी, जाणताहेत सर्ववृत्तांत जीचेठायीं ती. कृ. विद्धा. ज्ञानअ. अर्थ वेदिशब्दाप्रमाणें. ई. स्त्री.

वेधनिका विध्यतेनयावेधनीसैववेधनिका, मुक्तादि वेधन करिजेतें जीणेंकरून ती. न. स्नामतावगैरे छिद्र पाडण्याचें हत्यार. आ. स्त्री.

वेधमुख्यकः वेधेमुख्यः वेधमुख्यः सएववेधमुख्यकः, वेधाविषयीं जो मुख्य तोच वेधमुख्यक. त. कचूर. अ. पु.

वेधाः विदधातीतिवेधाः, विशेषें करूनउत्पन्नव पोषणकरितो जो तो. कृ. डुधाञ्धा. धारणाद्य. ब्रह्मदेव. २ विष्णु. ३ बुधनामा ग्रह. ४ पंडित. स. पु.

वेधितः वेध्यतेस्मवेधितः, भेदन करिजेला जो तो. कृ. विद्धा. विधानअ. छिद्र पाडलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वेपथुः वेपतइतिवेपथुः, कंपायमान असतो जो तो. कृ. टुवेपृधा. कंपनअ. कंप. उ. पु.

वेमा वयत्यनेनवेमा, जेणें करून विणतो जो तो. कृ. वेञ्धा. तंतुसंतानअ. कोष्ट्याचें घोडें. न. पु.

वेला वेदतीतिवेला, चंचल गामी असते जी ती. कृ. वेलृधा. गतिअ. मर्यादा. २ काळवेळ. ३ समुद्राची मर्यादा. आ. स्त्री.

वेल्लं वेल्लतीतिवेल्लं, संचलन करितें जें तें. कृ. वेल्लधा. संचलनअ. वावडिंग. अ. न.

वेल्लजं वेल्लनंवेल्लः वेल्लंजायते

वेल्लजं, स्वभक्षणानें चांचल्यउत्पन्न करणारें जें तें. क्र. जनी धा. प्रादुर्भावअ. मिरीं. अ. न.

वेल्लिः वल्लतीतिवेल्लिः, संवरण करिते जी ती. कृ. वल्ल धा. संवरणअ. वेल, लता. इ. स्त्री.

वेल्लितं वेल्लतिस्मवेल्लितं, चंचल झालें जें तें. क्र. वेल्लुधा. चलनअ. वांकडा. २ किंचित् कांपलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वेशः विश्यतेस्मिन्ननेनेतिवेशः, प्रवेश केला ज्याचेठायीं किंवा जेणें तो. क्र. विश धा. प्रवेशनअ. कलावंतीचा बाजार अथवा तीचें घर. २ अलंकारानीं केलेली शोभा. अ. पु.

वेशंतः महिषादयोऽस्मिन्विशंतीतिवेशंतः, महिषादिक प्रवेश करितात ज्याचेठायीं तो. क्र. विश धा. प्रवेशअ. अल्पसरोवर. अ. पु.

वेशवारः वेशनंवेशं वेशंवृणोतीतिवेशवारः, व्यंजनादिकांत जो प्रवेश त्यातें करितो जो तो. क्र. वृञ्धा. वरणअ. शाकादिकांत घालावयाचा मसाला व वेसवार. अ. पु.

वेश्म विशंत्यत्रवेश्म, प्रवेश करितात जन ज्याचेठायीं तें. क्र. विश धा. प्रवेशअ. घर. नृ. न.

वेश्मभूः वेश्मनोभूर्वेश्मभूः, गृहसंबंधी जी भूमी ती. स. घराची जागा. ऊ. स्त्री.

वेश्या वेशोसाधुर्वेश्या, वेशाविषयीं जी साधु ती. त. कसबीण. आ. स्त्री.

वेश्याजनसमाश्रयः वेश्याजनस्यसमाश्रयः वेश्याजनसमाश्रयः, वेश्याजनाचाजोसमाश्रय हा. वसतिस्थान तें. स. कलावतींचा बाजार. अ. पु.

वेषः विष्यतेनेनेतिवेषः, व्याप्ति करितो जेणें तो. क्र. विष्लृधा. व्याप्तिअ. अलंकारांनीं केलेली शोभा. अ. पु.

वेषवारः वेसवारः विग्रहादि सर्व वेशवार शब्दाप्रमाणें.

वेष्टितं वेष्ट्यतेस्मवेष्टितं, नद्यादिकें करून जें वेष्टित झालें जें नगरादिनें. क्र. वेष्टधा. वेष्टनअ. वेढलेलें. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वैहत् विहंतिगर्भंवैहत्, गर्भनाशकरिते जी ती. क्र. हनधा. हिंसाअ. गर्भपात करणारी गाय. त. स्त्री.

वै वातिइतिवै, पादपूरणाद्यर्थी प्रत वाचकतें करून गमन करितें जें तें. क्र. वाधा. गतिअ. पादपूरण. २ निश्चयत्वाअर्थी अव्य.

वैकक्षकं विशिष्टः कक्षोस्यास्ति कक्षकः विकक्षकेभवंवैकक्षकं गत आहे कक्षभागजाहून किंवा विकक्षा वेठायीं राहणारें जें तें. स. २ त. उपवीती सारखी घातलेली फुलांची माळ. अ. न.

वैकुंठः विकुंठाया अपत्यंवैकुंठः, विकुंठाजी तीचा जो पुत्र तो. त. विष्णु. अ. पु.

वैजननः विजायंते स्मिन्निति विजननः सएववैजननः, उत्पन्न होतो ज्याचेठायीं तो विजनन तोच वैजनन. त. प्रसूत होण्याचा महिना. अ. पु.

वैजयंतः वैजयंत्यः पताकाः संत्यस्येति वैजयंतः, पताकारूप ध्वज आहेत ज्यास तो. त. इंद्राचें गृह. अ. पु.

वैजयंतिकः वैजंती अस्यास्तीति वैजयंतिकः, ध्वज आहे ज्यास तो. त. जरीपटकेकरी. अ. पु.

वैजयंतिका विजयंतस्येयंवैजयंती सैववैजयंतिका, विजयंत संबंधी जी ती वैजयंती तीच वैजयंतिका. त. राहक ओषधी. आ. स्त्री.

वैजयंती विजयते विजयन् तस्येयंवैजयंती, जय करणारा संबंधी जी ती. त. पताका. ई. स्त्री.

वैज्ञानिकः विज्ञानेन जयतीति वैज्ञानिकः, बुद्धी करून जय करितो जो तो. त. निपुण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वैणवं वेणोरिदं वैणवं, वेणुसंबंधीं जें तें. त. वेळूचें फळादि. अ. न.

वैणविकः वेणोर्विकारो वैणवं तत् शिल्पमस्य वैणविकः, वेणूवादन करणारा जो तो. त. मुरली वगैरे वेणूचें वाद्य वाजविणारा. अ. पुल्लिंगी.

वैणिकः वीणाशिल्पमस्य वैणिकः, वीणा आहे शिल्प ज्याचें तो. त. वीणा वाजविणारा. अ. पु.

वैणुकं वेणुनानिवृत्तं वैणुकं, वे

णूकरून संपादित जें तें. त. वेळूचा दंड. अ. न.

वैतंसिकः वितंसेनमृगपक्ष्यादिबंधनोपायेनचरतीति वैतंसिकः, मृगादिबंधनो पायेंकरून उपजीविका करणारा. अ. पु.

वैतनिकः वेतनेजीवतीतिवैतनिकः, वेतनेंकरून जीवन पावतो जो तो. त. मजूरदार. अ. पु.

वैतरिणी विगतांतरणंयत्र वितरणं, वितरणेनरकलोकेभवावैतरणी, नरकलोकाचेठायीं उत्पन्न जी ती. त. नारकीसिंधुनदी. ई. स्त्री.

वैतालिकः विविधेनतालेनशब्देनचरतीतिवैतालिकः, अनेकशब्दानें संचार करणारा जो तो. त. राजाचा स्तुतिपाठकजन. अ. पु.

वैदेहकः विदेहेषुभवोवैदेहकः, विदेह देशाचेठायीं जो उत्पन्न तो. त. वैश्य. २ ब्राह्मणीचेठायीं वैश्यापासून जाहालेला पुत्र. अ. पु.

वैदेही विदेहेषुभवावैदेही, विदेहाचेठायीं जी जाहली ती. त. पिंपळी. ई. स्त्री.

वैद्यः विद्यामधीतेवैद्यः, विद्येतें अध्ययन करितो जो तो. त. चिकित्सक, २ सर्वजाणता. अ. पु.

वैद्यमाता वैद्यस्यमातेव वैद्यमाता, वैद्याला जी मातोश्री सारखी ती. स. अडुळसा. ऋ. स्त्री.

वैधात्रः विधातुरपत्यंवैधात्रः, ब्रह्मदेवाचें जो अपत्य तो. त. सनत्कुमारादिक. अ. पु.

वैधेयः विधेयविधानंतस्यायमधिकारीअविद्याविषयत्वाच्छास्त्राणांविधेयः, विधानाचा जो अधिकारी तो. त. मूर्ख. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

वैनतेयः विनताया अपत्यंवैनतेयः, विनतेचें जें अपत्य तो. त. गरुडपक्षी. अ. पु.

वैनीतकः विनीतकमेववैनीतकः, शिक्षित जें तें. त. पुरुषानीं वाहण्याचें यान. अ. पु. न.

वैमात्रेयः विमातुरपत्यंवैमात्रेयः, सावत्र आईचा जो पुत्र तो. त. सावत्र भाऊ. अ. पु.

वैमेयः विग्रहादिविनिमयशब्दा

प्रमाणें मोबदला. अ. पु.

वैय्याघ्रः व्याघ्रस्यविकारोवैय्याघ्रं, चर्म तेनपरिवृतोरथः वैय्याघ्रः, व्याघ्र चर्मानें वेष्टित जो रथ तो. त. व्याघ्राचे चामड्यानें वेष्टित रथादिक. वि. अ. पु. म. आ. स्त्री.

वैरं वीरस्यकर्मवैरं, वीराचें जें कर्म तें. त. द्वेष. अ. न.

वैरनिर्यातनं वैरस्यनिर्यातनंवैरनिर्यातनं, द्वेष निराकरण जें तें. स. वैर घालविणें. अ. न.

वैरशुद्धिः वैरस्यशुद्धिर्वैरशुद्धिः, द्वेषाची जीशुद्धि ती. स. वैर घालविणें. इ. स्त्री.

वैरी वीरस्यकर्मवैरं तदस्यास्तीति वैरी, वीर कर्म आहे ज्यास तो. त. शत्रु. इन्. पु.

वैवधिकः विवधंवहतीतिवैवधिकः, कावड वाहतो जो तो. त. जासूद. अ. पु.

वैवस्वतः विवस्वतोपत्यंवैवस्वतः, सूर्याचा जो पुत्र तो. त. यम. अ. पु.

वैशाखः विशाखायुक्तावैशाखी सायत्रास्तिसवैशाखः, विशाखायुक्त पौर्णिमा आहे ज्याचे ठायीं तो. त. वैशाखमास. २ मथनदंड. ३ धनुर्धरांचा स्थितिविशेषः. वीथीच्या अंतरानें दोनी पाय टेकून राहणें. अ. पु.

वैश्यः विडेववैश्यः, विट् जो तो च. त. चार वर्णांतील एक वर्ण वैश्य जाती. अ. पु.

वैश्रवणः विश्रवसोपत्यंवैश्रवणः, विश्रवस्याचें जें अपत्य तो. त. कुबेर. अ. पु.

वैश्वानरः विश्वनरस्यापत्यंवैश्वानरः, विश्व नराचें जें अपत्य तो. त. अग्नि. अ. पु.

वैसारिणः विसरणः संबंधिवैसारिणः, मत्स्यसंबंधी जो तो. त. मासा. अ. पु.

वौषट् उह्यतेनेनवौषट्, हवि र्वहन होतें जेणें तें. रु. वह् धा. प्रापणअ. यज्ञांतील देवांकारणें जें हविर्दान तदर्थी अव्य.

व्यक्तः व्यज्यतेइतिव्यक्तः, स्पष्ट करिजेतो जो तो. रु. अंज् धा. व्यक्त्यादि अ. विद्वान. २ स्फुट. वि.

अ. पु. न. आ. स्त्री.

व्यक्तिः व्यज्यतइतिव्यक्तिः, व्यज्यते ह्म. घटादिरूपेंकरून स्पष्ट होत्येजीती. कृ. अंजूधा. व्यक्त्यादिअ. घटपटादिरूप जो जाती चा आश्रय ती. इ. स्त्री.

व्यग्रः विरुद्धमगति व्यग्रः, विरुद्ध गमन करितोजो तो. कृ. अगधा. कुटिलगतिअ. अनेक अर्थांचेठायीं ज्याणें चित्त लाविलें तो. २ व्याकुल. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यजनं व्यजंत्यनेनेतिव्यजनं, वीजितकरितात जेणेंतें. कृ. अजधा. गतिअ. विंजणा. अ. न.

व्यंजकः व्यनक्त्यर्थंव्यंजकः, अर्थातें स्पष्ट करितो जो तो. कृ. अंजूधा. व्यक्तिअ. हस्तादिकानें मनांतील अभिप्राय सूचविणें. अ. पु.

व्यंजनं व्यजंत्यनेनेतिव्यंजनं, वारा घालता हेत जेणेंकरून तें. कृ. अजधा. गतिअ. विंझणा २ कढीवगैरे. अ. न.

व्यडंबकः व्यडंमलमवयतीति व्यडंबकः, मलातें स्रंसन ह्म. निस्सरण करितो जो तो. कृ. अवधा. स्रंसनअ. एरंडाचें झाड. अ. पु.

व्यडंबनः विग्रहादिसर्वव्यडंबकशब्दाप्रमाणें. एरंडाचें झाड. अ. पुल्लिंगीं

व्यत्ययः व्यत्ययनंव्यत्ययः, विपर्यास जो तो. कृ. इणधा. गतिअ. व्यतिक्रम. अ. पु.

व्यत्यासः व्यत्यसनंव्यत्यासः, विपर्यास जो तो. कृ. असुधा. क्षेपअ. व्यतिक्रम. अ. पु.

व्यथा व्यथंतेनयाव्यथा, दुःख पावतात जीणें ती. कृ. व्यथधा. भयादिकअ. मनास जी पीडा ती. आ. स्त्री.

व्यधः व्यधनंव्यधः, वेधन जें तो. कृ. व्यधधा. ताडनअ. वेधणें अ. पुल्लिंगीं.

व्यध्वः विरुद्धोध्वाव्यध्वः, विरुद्ध जो मार्ग तो. स. दुर्मार्ग कंटकादियुक्तमार्ग. अ. पु.

व्ययः व्ययनंव्ययः, धननाश जो तो. कृ. व्ययधा. वित्तसमुत्सर्गअ. द्रव्याचा वगैरे खर्च. अ. पु.

व्यलीकं अलतीत्यलीकं, विगतमलीकंव्यलीकं, विगत जें अप्रिय

तें. स. पीडा. अ. न. २ अप्रिय. ३ कर्तव्यानर्ह. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यवधा व्यवधानंव्यवधा, आच्छादनजें तें. कृ. डुधाञ्‌धा. धारणादि अ. आच्छादन. आ. स्त्री.

व्यवहारः व्यवहरत्यनेनव्यवहारः, व्यवहार करितो जेणेंकरून तो. कृ. हृञ्‌धा. हरणअ. व्यापार. अ. पु.

व्यवायः व्यवायनंव्यवायः, मैथुनजें तो. कृ. इण्‌धा. गतिअ. मैथुन. अ. पु.

व्यसनं व्यस्तिव्यस्यतेनेनवाव्यसनं, क्षेपण करितें किंवा करिजेतें जेणेंकरून तें. कृ. असूधा. क्षेपणअ. पाप. २ निष्फल जो उद्योग तो. ३ अशुभ. ४ विपत्ति. ५ भ्रंश. ६ कामज कोपजादि दोष. अ. न.

व्यसनार्तः व्यसनेनार्तोव्यसनार्तः, दुःखानें जो पीडित तो. स. व्यसनानें पीडित. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यस्तः व्यस्यतेस्मव्यस्तः, क्षिप्त करिजेला जो तो. कृ. असूधा. क्षेपणअ. व्याकुळ. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिंगीं.

व्याकुलः व्याकोलतीतिव्याकुलः, इतिकर्तव्यताशून्य होतो जो तो. कृ. कुलधा. संस्थानबंधवाद्य. शोकादिकेंकरून कर्तव्य विचारशून्य. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्याकोशः व्यावृत्तः कोशः संकोचोयस्मादितिव्याकोशः, व्यावृत्त आहे संकोच ज्यापासून तो. स. प्रफुल्लित. वि. अ. पु. न. आ. स्त्रीलिंगीं.

व्याघ्रः विशेषेणआजिघ्रतीतिव्याघ्रः, विशेषेंकरून गंधग्रहण करितो जो तो. कृ. घ्राधा. गंधग्रहणअ. वाघ. अ. पु.

व्याघ्रनखं व्याघ्रस्यनखमिवव्याघ्रनखं, व्याघ्राचे नखासारिखें जें तें. स. नखला. अ. न.

व्याघ्रपाद् व्याघ्रस्येवपादमूलान्यस्येतिव्याघ्रपात्, व्याघ्राचे सारखीं आहेत पादमूलें ज्याचीं तो. स. वृक्षविशेष. व्. पु.

व्याघ्रपुच्छः व्याघ्रस्येवपुच्छंयस्य व्याघ्रपुच्छः, व्याघ्राचे पुच्छासा

रखें आहे पानजाचें तो. स. एरंडाचें झाड. अ. पु.

व्याघ्राट: व्याघ्रइवअटतीतिव्याघ्राट:, व्याघ्रासारिखें गमन करितो जो तो. कृ. अटधा. गतिअ. कुकुडकोंबापक्षी. अ. पु.

व्याघ्री व्याजिघ्रतीतिव्याघ्री, गंधग्रहणकरित्ये जी ती. कृ. घ्राधा. गंधोपादानअ. व्याघ्रीण. २ रिंगणी वनस्पती. ई. स्त्री.

व्याज: व्यजनंव्याज:, विशेषेंकरूनजें क्षेपणतें. कृ. अजधा. क्षेपणअ. कपट. २ इष्टसिद्धीसाठीं वास्तविक अर्थ गुप्त ठेवूनअर्थांतर दाखविणें. अ. पु.

व्याड: व्याडतीतिव्याड:, भक्षणार्थ उद्योग करितो जो तो. कृ. अडधा. उद्यमनअ. सर्प. २ वाघ. ३ दुष्ट. अ. पु.

व्याडायुध: व्याडस्यव्याघ्रस्यआयुधमिवव्याडायुध:, व्याघ्राचेंनखायुधाप्रमाणें जें तें. स. नखला. अ. न.

व्याध: विध्यतीतिव्याध:, बाणेंकरून वेध करितो जो तो. कृ. व्यधधा. ताडनअ. पारधी. अ. पु.

व्याधि: विविधाआधि: व्याधि:, अनेक जी पीडा तो. स. रोग. २ गोडें कोष्ठ. कुडुकोष्ठ. इ. पु.

व्याधिघात: व्याधिनंहंतीतिव्याधिघात:, व्याधीतें नाश करितो जो तो. कृ. हनधा. हिंसाअ. बाहव्याचें झाड. अ. पु.

व्याधित: व्याधि: संजातोस्यव्याधित:, व्याधी जो तो संजात म्ह. झाला आहे ज्यास तो. त. रोगी. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यान: व्यानंत्यनेनेतिव्यान:, ज्याच्या विविध संचारानें प्राणि जगतात तो. कृ. अनधा. प्राणनअ. शरीरांत संचार करणारा पंचवायु. अ. पु.

व्यापाद: व्यापादनंव्यापाद:, द्रोह चिंतनजें तो. कृ. पदधा. गतिअ. शत्रुद्रोह चिंतन. अ. पु.

व्याप्यं व्याप्यतेतत् व्याप्यं, रोगातें व्याप्त करितें जें तें. कृ. आप्लृधा. व्याप्तिअ. कुडुकोष्ठ गोडें कोष्ठ. अ. न.

व्याम: विशेषेण अम्यतेनेनव्या

मः, विशेषेंकरून गणना करिजे
से जेणेंकरून तो. कृ. अमधा. ग
तिअ. चार हातांचें एक प्रमाण
आहे. अ. पु.

व्याल: विरुद्धमासमंतात्अलति
अडतिवाव्यालः, विरुद्ध आस
मंताद्भूषणादि किंवा उद्यम करि
तो जो तो. कृ. अलधा. भूषणा
दिअ. २अडधा. उद्यमअ. सर्प २ धूर्त
३दुष्टहत्ती. ४सिंह ५श्वापद. अ. पु.

व्यालग्राही व्यालंगृह्णातीतिव्या
लग्राही, सर्पातें ग्रहण करितोजो
तो. कृ. गृहूधा. ग्रहणअ. गारुडी
इन्. पु.

व्यालायुधं व्यालस्यव्याडस्यायुध
मित्यादिसर्वव्याडायुधशब्दाप्रमा
णें. नरवला. अ. न.

व्यावृत्त: व्याव्रियतेस्मव्यावृत्तः,
स्वीकृत करिजेला जो तो. कृ. वृञ्
धा. वरणअ. वेष्टिलेला. २ भिन्न
केलेला. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यास: व्यसनंव्यासः, विस्तार
जो तो. कृ. असूधा. क्षेपणअ.
विस्तार. २सत्यवतीचा पुत्र व्यास.
अ. पु.

व्याहार: व्याह्रियतेउच्यतेइति
व्याहारः, भाषण जें तो. कृ. हृञ्
धा. हरणअ. भाषण. अ. पु.

व्युत्थानं विरुद्धमुत्थानंव्युत्थानं,
विरुद्ध जें उत्थान तें. स. तिरस्का
र. २विरोधाचरण. ३स्वातंत्र्यें करू
न जें कृत्य तें. अ. न.

व्युष्टि: व्युच्छनंव्युष्टिः, सम्यक् जी
आली ती. कृ. उच्छीधा. विवास
अ. साध्य. २ संपत्ती. इ. स्त्री.

व्यूढ: विशेषेणउह्यतेस्मव्यूढः, वि
शेषेंकरून प्रापण करिजेला जो
तो. कृ. वहधा. प्रापणअ. एकेठि
काणीं मिळविलेला. २ स्थापित. ३
विस्तीर्ण. वि. अ. पु. न. आ. स्त्री.

व्यूढकंकट: व्यूढोधृतः कंकटो
येनसव्यूढकंकटः, धारण केलें
आहे कवच ज्याणें तो. स. कवच
धारण करणारा. अ. पु.

व्यूति: विशिष्टाऊतिर्व्यूतिः, विण
णें जें तें. कृ. वेञ्धा. तंतुसंतानअ.
विणणें. इ. स्त्री.

व्यूह: व्यूह्यतेइतिव्यूहः, संग्रामा
मध्यें स्थापन करिजेतो जो तो. कृ.
ऊहधा. वितर्कअ. युद्धार्थ सैन्या

चारचनाविशेष. २ समूह. अ. पु.

व्यूहपार्ष्णिः व्यूहस्यपार्ष्णिर्व्यूहपा र्ष्णिः, सेनारचनाविशेषाचा जो पृ ष्ठभाग तो. स. सैन्याच्याव्यूहाचा प श्चाद्भाग. इ. पु.

व्योकारः व्योकरोतीतिव्योकारः, लोह घीजातें करितोजो तो. कृ. डुकृ ञ्‌धा. करणअ. लोहार. अ. पु.

व्योमकेशः व्योम्निकेशायस्यस व्योमकेशः, आकाशीं आहेत केश ज्याचे तो. स. महादेव. अ. पु.

व्योम व्ययतेइतिव्योम, व्याप्त करि तेंजें तें. कृ. व्यय धा. संवरणअ. आकाश. न्. न.

व्योमयानं व्योमयातीति व्योमया नं, आकाशाप्रत गमन करितें जें तें. कृ. याधा. प्रापणअ. विमान. अ. न.

व्योषं विशेषेणओषतीतिव्योषं, वि शेषेंकरून दाह करितें जें तें. कृ. उ षधा. दाहअ. सुंठ मिरीं पिंपळी त्या तिहींचें चूर्ण. अ. न.

व्रजः व्रजतीतिव्रजः, गमन कर णारा जो तो. कृ. व्रजधा. गतिअ. २ गोठा. ३ मार्ग. अ. पु.

व्रज्या व्रजनंव्रज्या, व्रजन म्ह. ग मन जें तें. कृ. व्रजधा. गतिअ. भ्र मण. २ प्रयाण. आ. स्त्री.

व्रणः व्रणयतीतिव्रणः, गात्र म्ह. अं ग त्याचा छेद करितो जो तो. कृ. व्रण धा. गात्रविचूर्णनअ. व्रण. अ. पु.

व्रतं व्रजंत्यनेनस्वर्गंतद्व्रतं, ज्याचा योगानें लोक स्वर्गाप्रत जातात तें. कृ. व्रजधा. गतिअ. नियम. अ. न.

व्रततिः व्रतती व्रतमिवकरोती तिव्रततिः, व्रताप्रमाणें करिते म्ह. स्वीकृत वृक्षाश्रयानेंराहत्ये जी ती. सना. व्रतप्रकृतिकधा. तत्करणअ. वे ल. २ विस्तार. इ. २ ई. स्त्री.

व्रती व्रतंभोजनादिनियमोस्त्यस्य व्रती, भोजनादि नियम आहे ज्या स तो. त. ज्याणें व्रत केलें तो. २ य जमान. इन्. पु.

व्रश्चनः व्रश्च्यते ऽनेनव्रश्चनः, सुव र्णादि छेदन करिजेतें जेणें करून तो. कृ. व्रश्चूधा. छेदनअ. कानस. अ. पु.

व्रातः व्रततेनियम्यतेइतिव्रातः, नि यम करिजेतो जो तो. कृ. व्रतधा. नि यमनअ. समूह. अ. पु.

व्रात्यः व्रातंव्याप्यादिव्रातमर्हती

तिव्रात्यः, व्याध्यादिसमुदायानें योग्य होणारा जो तो. न. गौण- काल १६ वर्षें पर्यंत ज्याचा सं- स्कार व्रतबंधादि झाला नाहीं तो वि. अ. पु. न. आ. स्त्री.

